आतील पानात...

- आधुनिक काळातील विज्ञानसूर्य : स्टीफन हॉकिंग
- औरंगजेबाच्या नावाने असलेल्या शहरांची आणि गावांची नावे केव्हा बदलणार ?
- ग्राहक संरक्षण कायदा आणि ग्राहक...



दैनिक

# अक्षराज

मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे    Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

जी इच्छा मनातून आणि शुद्ध अंतकरणातून
निघत असते व जे खूप तीव्र देखील असते,
त्यात खूपच जास्ती
सकारात्मक ऊर्जा समाविष्ट असते...


● वर्ष ०३ रे ● अंक १४२ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, शनिवार, दि.१४ मार्च २०२६ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 03 ● ISSUE : 142 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Saturday, 14 March 2026 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023


## मुंबईत मार्चमधील तिसरी उष्णतेची लाट! दोन दिवस पारा पुन्हा चढणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** गेले दोन दिवस मुंबईतील तापमानात ५-६ अंश सेल्सिअसने घट झाल्यानंतर आता पुन्हा उन्हाचा तडाखा वाढणार आहे. हवामान विभागाने मुंबईतील काही ठिकाणांना शुक्रवार आणि शनिवारी उष्णतेची लाट येण्याच्या इशारा दिला आहे. त्यामुळे पुढील दोन दिवस शहरातील तापमान वाढणार आहे. १३ आणि १४ मार्च दरम्यान मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये उष्ण व दमट वातावरणासाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे.



मार्चमधील तिसरी उष्णतेची लाट

गुरूवारी सांताक्रूझमध्ये ३२ -३३ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदवलं गेलं होतं. पण शुक्रावरी हे तापमान पुन्हा वाढणार आहे. मार्च महिना सुरू झाल्यापासून मुंबईमधील ही तिसरी उष्णतेची लाट आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार येत्या एप्रिल आणि मे महिन्यात हवामान नेहमीपेक्षा अधिक उष्ण असणार आहे.

गेल्या १२ दिवसांतली शहरातील ही तिसरी उष्णतेची लाट असेल. ५, ९ आणि १० मार्च रोजी यापूर्वी शहरात हीट व्हेवची स्थिती निर्माण झाली होती. १० मार्च रोजी, तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसवर पोहचला होता. १२ मार्चला हा पारा उतरला होता. सांताक्रूझमध्ये ३३.१ सेल्सिअस तर कुलाब्यामध्ये ३२.७ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती. किमान तापमान गेले काही दिवस स्थिर होतं.

**तापमान वाढीचं कारण काय?**

हवामान निरीक्षक अभिजीत मोडक यांनी या वाढत्या तापमानाबद्दल माहिती दिली. 'बुधवारी तापमानात थोडी घट झाली होती पण गुरूवारपासून पुन्हा उष्णतेच्या लाटेसारखी परिस्थिती निर्माण होणार आहे. मुंबईतील उपनगरांपासून कोकण किनारपट्टीपर्यंत उष्णतेचा लाटेचं संकट निर्माण होणार आहे. विक्रोळी, ठाणे आणि नवी मुंबईसारख्या भागांमध्ये सर्वाधिक परिणाम होईल. स्वतंत्र हवामान निरीक्षक अथ्रेया शेट्टी यांच्या अंदाजानुसार प्रत्यक्षात मुंबईमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता फार कमी आहे. अरबी समुद्रात अँटी सायक्लेन कमकुवत झालं असून यामुळे मुंबईच्या दिशेने येणाऱ्या वाऱ्यामुळे तापमान वाढण्याची शक्यता आहे. यामुळे हवामान विभागाने इशारा दिला असून प्रत्यक्षात उष्णतेची लाट निर्माण होण्याची शक्यता कमी असल्याची त्यांनी माहिती दिली आहे.

दरम्यान, मराठवाडा आणि विदर्भात हवामान विभागाने वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा दिला आहे. यामुळे रविवारपर्यंत या भागांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता आहे. मुंबई आणि कोकणात सध्या पावसाचा इशारा नाही.

## वन्यप्राणी–मानव संघर्ष रोखण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर : वन मंत्री गणेश नाईक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, मुंबई :** वाघ व बिबट्यांचे हल्ले, वन्यप्राणी–मानव संघर्ष आणि वनसंवर्धनाच्या उपाययोजनांसाठी तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध उपाययोजना राबविण्यात येणार असल्याची माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभा सदस्यांनी वन विभागासंदर्भातील उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना वन मंत्री गणेश नाईक यांनी सांगितले की, राज्यात वाघ–बिबट्यांच्या हल्ल्यांवर नियंत्रण, त्यांचे संरक्षण आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी सॅटेलाईट व आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. यासाठी वन विभागाला जमीनीच्या बदल्यात मिळणारा निधी, 'एमडीएस' मधून उभारण्यात येणारे कर्ज आणि इतर स्रोतांद्वारे मिळून सुमारे २४ हजार कोटी रुपये उपलब्ध होतील.

चर्चेत वाघ–बिबट्यांचा प्रादुर्भाव, वनपट्टे, वनउद्यान उभारणी, वनजमिनीवरील अतिक्रमण, तसेच वन्यप्राणी हल्ल्यातील पीडित कुटुंबांना मदत अशा विविध विषयांवर सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर उत्तर देताना वन मंत्री नाईक म्हणाले की, वन विभागाबाबत लोकांच्या भावना सकारात्मक होत आहेत. राज्यातील २१ टक्के क्षेत्र वनाखाली असून ते ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून लोकसहभाग वाढवून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जात आहे. राज्य सरकारने ३०० कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला असून यावर्षी १० कोटी झाडे लावण्यात आली आहेत. पुढील वर्षांत ही संख्या वाढवत नेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



तसेच पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये बिबट्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्याने त्यावर नियंत्रणासाठी प्रयोगात्मक उपाययोजना करण्यास केंद्र सरकारने मान्यता दिली असून पुढील काही महिन्यांत त्याचे परिणाम दिसून येतील, असेही त्यांनी नमूद केले.

वन विभागातील मनुष्यबळाबाबत वन मंत्री नाईक म्हणाले की, दीर्घकाळ तात्पुरत्या स्वरूपात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडेही लक्ष दिले जाईल. उपलब्ध निधीतून वनसंवर्धन, वनाग्नि नियंत्रण, वृक्षलागवड व कर्मचारी यंत्रणा मजबूत करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## मुंबईत बिहारी लोकांसाठी प्रशस्त बिहार भवन !

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, मुंबई :** मुंबईत राहणाऱ्या बिहारी लोकांसाठी बिहार भवन ही इमारत बांधली जाणार आहे. या इमारतीची तात्पुरती डिझाइन मंजूर झाली असून आता टेंडर सुद्धा जारी करण्यात आल्याची माहिती बिहार फाउंडेशनने दिली आहे.



ही इमारत मुंबईच्या पी.डी. मेलियो रोडजवळ वाडी बंदर भागात बांधली जाईल. ही एक ३० मजली उंच इमारत असेल, ज्यात ग्राउंड फ्लोअर व्यतिरिक्त ३० मजले असतील. हे स्थान मुंबईच्या मध्यभागी आहे, ज्यामुळे येथे येणे सोपे होईल. ही इमारत आधुनिक डिझाइनची असेल आणि ती मुंबईच्या आकाशरेषेत एक नवीन जोड देईल. या भागात पूर्वी मुंबई पोर्ट ट्रस्टची मालमत्ता होती, पण आता ती बिहार सरकारकडे आहे. या इमारतीमुळे या भागाचा विकास होईल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास बिहार ट्रस्टकडून व्यक्त केला जातोय.

या इमारतीत अनेक सुविधा असतील. यात गुंतवणूक आयोग केंद्र असेल, जेथे बिहारी लोकांना व्यवसाय आणि गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन मिळेल. अतिथी कक्ष असतील, ज्यात पाहुणे राहू शकतील. मुंबईतील रुग्णालयात उपचार घेणाऱ्या बिहार रुग्णांच्या नातेवाईकांसाठी विशेष निवास व्यवस्था असेल. याशिवाय सांस्कृतिक क्रियाकलापांसाठी हॉल, समुदाय सभागृह आणि अधिकृत कार्यांसाठी जागा असतील. ही इमारत बिहारी संस्कृतीचे प्रदर्शन करेल आणि लोकांना एकत्र आणेल. या सुविधांमुळे मुंबईतील बिहारी लोकांना आपल्या मूळ राज्याशी जोडलेले वाटेल.

या प्रकल्पाचा एकूण खर्च ३१४ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. हे पैसे बिहार सरकार देईल. डिझाइन मंजूर झाल्याने आता टेंडर प्रक्रिया सुरू आहे. लवकरच बांधकाम सुरू होईल आणि ते पूर्ण होण्यास काही वर्ष लागतील. या इमारतीमुळे मुंबईतील बिहारी लोकांना फायदा होईल, पण खर्च मोठा असल्याने ते व्यवस्थित वापरले जाईल. हे प्रकल्प बिहार आणि महाराष्ट्रातील संबंध मजबूत करेल.

दरम्यान ही इमारत मुंबईतील बिहारी प्रवाशांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. यामुळे त्यांना नोकरी, शिक्षण आणि आरोग्य सुविधांबाबत मदत मिळवून दिली जाईल.यातून बिहारी संस्कृतीला प्रोत्साहन मिळेल आणि समुदाय देखील मजबूत होईल, अशी माहिती देण्यात आली आहे. ही इमारत म्हणजे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून काम करेल, जेथे सण, उत्सव आणि सभा होतील. मुंबईत राहणाऱ्या बिहारी लोकांसाठी ही एक मोठी मदत असेल, कारण यामुळे त्यांना आपल्या राज्याशी जवळीक ठेवून सतत राज्याशी जोडलेले वाटेल. हा प्रकल्प बिहार सरकारच्या प्रयत्नांचा भाग आहे, ज्यामुळे प्रवाशांना फायदाच होईल, असेही बिहार ट्रस्टकडून सांगण्यात आले आहे.

## महाराष्ट्र केसरी २०२५ बोधचिन्हाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, पुणे :** वाघोलीत होणाऱ्या ६८ व्या 'महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या अधिकृत बोधचिन्हाचे (लोगो) अनावरण व मानाच्या गदेचे पूजन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत उत्साहात संपन्न झाले.

वर्षा या शासकीय निवासस्थानी यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पर्धेच्या नियोजनाची सविस्तर माहिती घेत आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले व स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन १८ मार्च ते २२ मार्च २०२६ या कालावधीत वाघोली, पुणे येथे करण्यात आले आहे.




सदर स्पर्धेच्या समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले असून त्यांनी ते स्वीकारले आहे. यंदाच्या महाराष्ट्र केसरी विजेत्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मानाची गदा आणि फॉर्च्युनर गाडी देऊन गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे सरचिटणीस पै. योगेश दोडके, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके, नगरसेवक अनिल सातव पाटील महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सचिव संजय शेटे तसेच नटराज सातव पाटील, सुनील (चाचा) जाधवराव, राहुल सातव, केतन जाधव, सागर सातव, महेश माने, मुकेश सातव, संदीप वारे, मयूर सातव आदी मान्यवर उपस्थित होते.

**कुस्तीमहर्षी मामासाहेब मोहोळ यांच्या स्मरणार्थ विजेत्यास मानाची गदा**

● मुळशीतील मामासाहेब मोहोळ कुटुंब तर्फे महाराष्ट्र केसरी विजेत्यास मानाची गदा देण्याची परंपरा आहे. केंद्रीय राज्यमंत्रि मुरलीधर मोहोळ यांच्यावतीने यंदा गदा देण्यात येणार आहे.

कुस्तीला लोकप्रियता आणि सर्वमान्यता मिळवून देणे आवश्यक आहे. कुस्ती स्पर्धेला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी स्पर्धा दर्जेदार होणे आवश्यक आहे असे मत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले.

**सुनेत्रा पवारांनी पूजली 'मानाची गदा'**

● 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेच्या आयोजकांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्या हस्ते महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील मानाची गदा पूजण्यात आली. कुस्ती ही महाराष्ट्राची समृद्ध परंपरा आहे, अशा प्रतिष्ठित स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मल्लांना मोठे व्यासपीठ मिळते, अशा भावना व्यक्त करून त्यांनी स्पर्धेला शुभेच्छा दिल्या.

## बेलापूर विभागामार्फत, अनधिकृत झोपडयांवर धडक मोहिम !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभाग कार्यक्षेत्रात अनधिकृत झोपड्या निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील, सेक्टर-३०, नेरुळ नवी मुंबई, विठ्ठल रुक्मीणी मंदिरासमोरील सिडकोच्या भुखंडावरील असलेल्या अनधिकृत झोपड्या स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत झोपड्या स्वत:हून हटवून न घेतल्याने त्यानुसार सदर ठिकाणी दि.१२/०३/२०२६ रोजी निष्कासनाची कारवाई सुरु करण्यात आली. सदर कारवाईमध्ये सेक्टर-२८, नेरुळ, नवी मुंबई, विठ्ठल रुक्मणी मंदिरासमोरील सिडकोच्या भुखंडावरील अनधिकृत झोपड्या- ०५ निष्कासित करण्यात आलेल्या आहेत.

सदर अनधिकृत झोपड्यांवर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत झोपडयांवर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे. या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालय अंतर्गत बेलापूर विभागातील, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी, प्रशांत नेरकर, सहा. अभियंता आत्माराम काळे व विभागातील इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. सदर मोहिमेसाठी मजूर, इत्यादी मनुष्यबळ व साधनसामुग्री वापरण्यात आली. तसेच अतिक्रमण विभागातील पोलिस अधिकारी/ कर्मचारी व सुरक्षारक्षक उपस्थित होते. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## विझमोनीने गाठली नवीन उंची !

### उल्हासनगरमध्ये ३३७ व्या शाखेचे भव्य उद्घाटन

**अक्षराज : संतोष गवळी**

**दि.१२, ठाणे :** विझमोनी (पूर्वीचे युनिमोनी) ने आज उल्हासनगरमध्ये अधिकृतपणे आपले दरवाजे उघडले. आता राष्ट्रीय स्तरावर ३३७ ठिकाणी आणि महाराष्ट्रात १६ व्या क्रमांकावर कार्यरत असलेली कंपनी, तळमजला, जेठानंद सोसायटी लिमिटेड, दुकान क्रमांक ६-७, महानगरपालिका कार्यालयाजवळ, या महत्त्वाच्या क्षेत्रात प्रवेश केला, सोने कर्ज, परकीय चलन, पैसे पाठवणे आणि प्रवासी उपाय थेट समुदायाच्या दाराशी पोहोचवण्याच्या धोरणात्मक प्रयत्नाचे प्रतीक आहे.




सीए कृष्णन आर, संचालक आणि सीईओ विझमोनी यांनी विझमोनी नेतृत्व टीम - मनोज व्ही मॅथ्यू (सीएफओ), बी सतीश कुमार (सीओओ), रथीश आर (सीपीओ) आणि राष्ट्रीय व्यवसाय प्रमुख - प्रकाश भास्कर (फॉरेक्स), जॉन जॉर्ज (प्रवास आणि सुट्टी), टायटस के (गोल्ड लोन) यांच्या सन्माननीय उपस्थितीत शाखेचे उद्घाटन केले. जिनू जॉर्ज, उपाध्यक्ष आणि झोनल हेड वेस्ट इंडिया, विनोद अमीन, प्रादेशिक प्रमुख-मुंबई, संतोष राजाराम चाळके, शाखा प्रमुख, मान्यवर पाहुणे आणि ग्राहक उपस्थित होते.

उल्हासनगरसारख्या गतिमान आणि कष्टाळू शहरात हा टप्पा गाठणे हा आमच्या संपूर्ण संस्थेसाठी आनंदाचा क्षण आहे. मुंबई महानगर प्रदेशात हे शहर एक महत्त्वाचे व्यावसायिक केंद्र म्हणून वाढत असताना, जलद, विश्वासार्ह आणि पारदर्शक वित्तीय सेवांची मागणी सर्वकालीन उच्चांकावर आहे. ही शाखा उघडणे हे एक वचन आहे. आम्ही शहरातील केवळ एक कंपनी नाही आहोत - आम्ही आता तुमच्या समुदायाचा एक भाग आहोत

**-विझमोनीचे संचालक आणि सीईओ सीए कृष्णन आर म्हणाले.**

शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सीएसआर धोरणाच्या अनुषंगाने, अधिकाऱ्यांनी शाखेच्या जवळच्या परिसरातील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग किटचे वाटप केले. त्याच वेळी, वृद्धांना मदतीचा हात पुढे करत, टीमने जानिव आश्रम वृद्धाश्रमाला आवश्यक अन्नधान्य दान केले, ज्यामुळे सर्व पिढ्यांमध्ये सामाजिक कल्याणासाठी वचनबद्धता बळकट झाली.

**विझमोनी बद्दल...**

➤ विझमोनी, पूर्वी युनिमोनी म्हणून ओळखले जाणारे, एक विश्वासार्ह एनबीएफसी आणि एडी-खख परवानाधारक वित्तीय सेवा प्रदाता आहे ज्याच्या भारतभरात ३००+ शाखा आहेत. या कंपनीच्या गोल्ड लोन, फॉरेन एक्सचेंज, परदेशात पैसे पाठवणे, मल्टी-करन्सी ट्रॅव्हल कार्ड, ट्रॅव्हल आणि हॉलिडेज, डिजिटल पेमेंट्स, वॉलेट सोल्यूशन्स आणि विमा ही सेवा उपलब्ध आहे.

विझमोनी, युएई आणि भारतात मुख्यालय असलेल्या जागतिक फिनटेक लीडर, विझ फायनान्शियलचा भाग आहे, जो उच्च-वाढीच्या बाजारपेठांमध्ये आणि प्रमुख आर्थिक कॉरिडॉरमध्ये सुरक्षित, तंत्रज्ञान-चालित, एआय-संचालित पेमेंट आणि कर्ज देण्याचे उपाय प्रदान करतो.

देशभर सोयीस्कर आणि विश्वासार्ह आर्थिक उपाय प्रदान करण्यासाठी वचनबद्ध, विझमोनी ग्राहकांना अखंड आर्थिक सेवांसह सक्षम करत आहे. अधिक माहितीसाठी, www.unimoni.in ला भेट द्या किंवा १८०० १०२ ०५५५ वर संपर्क साधा किंवा ईमेल करा. customercare@unimoniindia.com.

## वादळी पावसाची शक्यता ! शेतकऱ्यांनी दक्षता घ्यावी...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, मुंबई :** १७ ते २० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही. सध्याच्या अंदाजानुसार १८ ते २० मार्च दरम्यान या हवामान घडामोडींची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.



शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# संपादकीय

## एकल महिलांसाठी धोरण

आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू असून लवकरच त्याआधारे धोरण केले जाईल, असे जाहीर केले. यानिमित्ताने एक दुर्लक्षित समूह शासन आणि समाज यांच्या अजेंड्यावर येतो आहे. मोठी संख्या असूनही विस्कळित असल्याने एकल महिला या आजवर धोरणाचा विषय झाल्या नाहीत. २०११च्या जणगणनेत भारतात एकल महिलांची संख्या ७ कोटी ३० लाख होती. ही संख्या एकूण महिलांच्या संख्येच्या १२ टक्के होती. महाराष्ट्रात ५४ लाख एकल महिला होत्या. जनगणना होऊन १५ वर्षे उलटली आहेत. करोनात झालेले हजारो मृत्यू, अपघात, आजाराचे मृत्यू आणि दारूने गावोगावी जीव गमावणाऱ्या तरुणांची संख्या तर आपल्या कल्पनेपलीकडे आहे. हे बघता महाराष्ट्रातील एकल महिलांची संख्या येत्या जनगणनेत ७५ लाखांपेक्षा जास्त असू शकते.

सुदैवाने महाराष्ट्रातील ३२ जिल्हा परिषदांनी सुरू केलेले एकल महिलांचे सर्वेक्षण पूर्ण होत आले आहे. सरासरी ७५ हजार महिला फक्त ग्रामपंचायत क्षेत्रात आढळल्या. अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांत फक्त ग्रामीण भागात एकल महिलांची संख्या एक लाखापेक्षा जास्त आढळली. शहरी भागातील संख्या दुपटीने निघेल. याबाबतच्या धोरणामुळे या महिलांचे प्रश्न समोर येतील. नोकरशाही आणि लोकप्रतिनिधी या महिलांप्रति संवेदनशील होतील. वेगवेगळ्या विभागाच्या योजना एकत्र करून त्यांचे सक्षमीकरण होऊ शकेल. या महिलांचा रोजगार, मुलांचे शिक्षण, मालमत्ता हक्क, सामाजिक सन्मान, प्रतिनिधित्व असे अनेक विषय मार्गी लागतील.

एकल महिला हा समूह एकसंध नाही. श्रीमंत कुटुंबापासून आदिवासी पाडे आणि पालांपर्यंत आर्थिक स्तर, वय, शहरी, ग्रामीण, उच्चशिक्षित ते निरक्षर अशा समूहांमध्ये त्या विभागलेल्या आहेत. अशा सर्व महिलांना आवाक्यात घेईल, असे धोरण आखणे आव्हान असेल. त्यात, आर्थिक गरजा असणाऱ्या व नसणाऱ्या हे विभाजन आवश्यक असेल. वयवर्षे १८ ते ५० या गटातील आर्थिक गरजू महिलांसाठी रोजगाराची व्यवस्था करावी लागेल. मालमत्ता अधिकाराचा प्रश्न मात्र सर्वच एकल महिलांसंदर्भात कळीचा ठरणार आहे. कारण आर्थिक स्थिती कशीही असली तरी एकल महिलेला वाटा देण्याची मानसिकता समाजात नाही.

हे धोरण आखताना भारतातील इतर राज्ये एकल महिलांसाठी ज्या योजना अंमलात आणत आहे, त्याचा विशेष अभ्यास करायला हवा व त्यातील अनुकरणीय योजना धोरणात स्वीकारायला हव्यात. तमिळनाडूने विधवा महिलांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ सुरू केले आहे. त्यात कुठल्या योजना आहेत, कार्यपद्धती आहेत याचा अभ्यास करायला हवा. एकल महिलांच्या पुनर्विवाहासाठी काही राज्ये मदत करतात. त्यात झारखंडमध्ये दोन लाख रुपये, हिमाचल प्रदेशात २० हजार रु. रोख व ३० हजाराची ठेव पावती दिली जाते. राजस्थानात ३० हजार, केरळात मांगल्य योजनेत २५ हजार रुपये दिले जातात. विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी तेलंगण सरकार १ लाख १६ हजार रुपये देते. उत्तराखंड सरकार, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, पंजाब सरकार एकल महिलांच्या मुलींच्या लग्नासाठी ५० हजारपर्यंत मदत करतात. तमिळनाडू सरकार एकल महिलांच्या मुलीच्या लग्नात शिक्षणाच्या प्रमाणात रक्कम वाढवते. यातून मुली शिकतात.

एकल महिलांच्या रोजगारासाठीही राज्ये अनेक योजना राबवतात. केरळमध्ये सहाय्य हस्तम योजनेत एकवेळ व्यवसायासाठी मोठी मदत दिली जाते. तेलंगणमध्ये अल्पसंख्याक एकल महिलांच्या व्यवसायासाठी ५० हजारांची मदत, कर्नाटकात उद्योगिनी योजनेत तीन लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज व त्यात १० हजारांचे अनुदान दिले जाते. हरियाणात अनुदानित ऋण योजनेत एकल महिलांना तीन लाखांचे कर्ज देऊन ५० हजारांपर्यंतचे व्याज सरकार भरते. उत्तराखंडसारखे छोटे राज्य एकल महिलांना ५० हजार ते दोन लाखांपर्यंत एक टक्का व्याजदराने कर्ज देऊन त्यात ५० टक्के सबसिडी देते. छत्तीसगडमध्ये शक्ती स्वरूप योजनेत घेतलेल्या कर्ज योजनेत ३० हजारांपर्यंत सबसिडी दिली जाते. तमिळनाडू विधवा महामंडळ विधवा महिलांना रोजगारासाठी ३० हजारांची मदत करते. पुरोगामी महाराष्ट्रात एकल महिलांसाठी मात्र रोजगाराची कोणतीही स्वतंत्र योजना नाही.

सुदैवाने महाराष्ट्रात उमेद अभियान व महिला आर्थिक विकास महामंडळ यांचे बचत गट चांगले काम करतात. ही व्यक्तिगत कर्जे त्यांच्यामार्फत एकल महिलांना वितरीत करून शासनाने त्यांचे व्याज भरले तर सध्याच्या व्यवस्थेत हे होऊ शकेल. नाशिक जिल्हा परिषदेने जिल्हा नियोजन निधीतून एकल महिलांच्या ३० हजारापर्यंत व्यवसाय कर्जाचे व्याज भरण्याचा निर्णय घेतला आहे. गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यात एकल महिलांचे सर्वेक्षण होऊन प्रत्येक तालुक्यात 'उमेद'मार्फत रोजगार कार्यशाळा घेण्यात येऊन त्यांचे व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. उमेद अभियानाने राज्यातील एकल महिलांची माहिती संकलित केली असून त्यावर काम सुरू केले आहे. या प्रयत्नांना एकल धोरणात बळ दिले पाहिजे.

बालविवाह आणि अल्प शिक्षण यांमुळे एकल असण्याचे प्रश्न अधिक गंभीर झाले आहेत. त्यामुळे मुलींची शालेय गळती आणि बालविवाह यांच्याशी हे धोरण जोडून बघावे लागेल. मुलींना चांगले शिक्षण, गळती रोखणे, पदवी, शिक्षण कौशल्ये झाल्यावरच लग्न हे एकल समस्येचे मूळ दूर करण्यावर धोरणाचा भर असायला हवा. एकल महिलांना दुय्यम वागवण्याच्या रीती परंपरा, त्यामागील तथाकथित धार्मिक विचार यालाही आव्हान देण्याचे प्रबोधनाचे कार्यक्रम असावेत. मुलांची जबाबदारी नको, म्हणून अपत्य असलेल्या एकल महिलांशी पुरुष विवाह करत नाहीत. त्यावर नाशिक जिल्हा परिषदेने एकल महिलांनी पुनर्विवाह केल्यास त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी एक लाखाची ठेवपावती ठेवून ती १८ वर्षानंतर मिळेल, अशी तरतूद केली. ही तरतूद राज्याच्या धोरणात यावी; कारण पुनर्विवाह चळवळीची महाराष्ट्रात मोठी परंपरा आहे. आपल्याकडील तंत्रशिक्षण महाग असल्याने एकल महिला पाल्यांना शिकवू शकत नाहीत. मुलांना शहरात ठेवण्याचा खर्च त्यांना परवडत नाही. सरकारने मुलींना उच्च शिक्षण मोफत केले, त्या धर्तीवर या मुलांना शिक्षण मोफत करून एकल महिलांच्या मुलामुलींना वसतिगृहात राखीव जागा ठेवाव्यात. त्यातून उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढेल.


सुरू असलेल्या व पूर्ण झालेल्या सर्वेक्षणात ज्येष्ठ वयाच्या महिलांची संख्या खूपच मोठी आहे. या महिलांसाठी शासनाच्या निवृत्तीवेतन वगळता कोणत्याच योजना नाहीत. अनेकींना मुले सांभाळत नाहीत, पण त्याची तक्रार त्या करू शकत नाहीत. वृद्ध आजारी एकल महिलांचे प्रश्न आणखी गंभीर आहेत. येणाऱ्या धोरणात या ज्येष्ठ महिलांकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. पोटगीसाठी न्यायालयात प्रलंबित खटले खूप आहेत. ते निकालात निघण्यासाठी कौटुंबिक न्यायालयांची संख्या वाढविणे किंवा असलेल्या न्यायालयांनी तालुका स्तरावर सुट्टीच्या दिवशी जाणे असे काही निर्णय व्हावेत.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने यापूर्वी केलेले एकल महिला धोरण प्रारूप, १९९०च्या परित्यक्ता चळवळीच्या मागण्या अभ्यासायला हव्यात. एकल महिलांसाठी काम करणाऱ्या सर्व संघटनांना सहभागी करून प्रत्येक जिल्ह्यात धोरणावर चर्चा घडवली तर एक व्यापक परिपूर्ण धोरण होऊ शकेल.

**- हेरंब कुलकर्णी**

# औरंगजेबाच्या नावाने असलेल्या शहरांची आणि गावांची नावे केव्हा बदलणार ?

स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज यांना हालहाल करून ठार करणारा औरंगजेब स्वराज्याचा सर्वांत मोठा शत्रू होता. एक महिना महाराजांचे त्यांनी अतोनात हाल केले, महाराजांना ठार करून त्याने त्यांच्या देहाचीही विटंबना केली. संभाजी महाराजांना ज्या महिन्यात औरंग्याने अतोनात यातना दिल्या तो संपूर्ण महिना राज्यातील अनेक स्वराज्यप्रेमी बलिदानमास म्हणून पाळतात. या काळात नेहमीच्या सुखांचा त्याग करतात. शालेय अभ्यासक्रमात आजतागायत औरंगजेबाचा उदोउदोच करण्यात आला त्यामुळे त्याचे खरे रूप लोकांसमोर आलेच नव्हते. इतिहासाच्या मोगल बादशहा औरंगजेब हा अत्यंत धार्मिक, परोपकारी राजा होता. तो स्वतःच्या हाताने टोप्या बनवी आणि त्याच्या विक्रीतून मिळणाऱ्या पैशातूनच स्वतःचा चरितार्थ चालवी असे काहीसे चित्र आजपर्यंतच्या शालेय अभ्यासक्रमातील इतिहासाच्या पुस्तकांतून आपल्या मनावर बिंबवले गेले. त्यामुळे आजही अनेकांना औरंगजेबाविषयी कमालीची आस्था आहे. औरंगजेबाला मानणारे आणि पुजणारे आजही समाजात मोठ्या संख्येने आहेत. अफझलखानानंतर औरंगजेबाच्या कबरीचे वाढत चाललेले प्रस्थ हेच दर्शवत आहे. आजही त्याठिकाणी हिंदू राजकीय नेत्यांची आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणात रेलचेल पाहायला मिळते. औरंगजेबाच्या तुकडयांवर जगणाऱ्या काही भारतीय इतिहासकारांनी त्याकाळी त्याची महत्ती सांगणारी खोटी वर्णने इतिहास म्हणून मांडली आणि तेच सत्य समजून आपण आजतागायत ते गिरवत आलो आहोत. ज्याचा परिणाम म्हणून आज देशभरात त्याच्या नावावर किमान १७७ शहरे आणि गावे आहेत. देशभरात ६३ शहरे किंवा गावे यांना 'औरंगाबाद' असे नाव आहे. यांतील ४८ शहरे किंवा गावे उत्तरप्रदेशात आहेत. औरंगाबाद व्यतिरिक्त औरंगपुरा नावाची ३५, औरंगनगर नावाची ३ आणि औरंगजेबपूर नावाची १३ तर औरंगपोर नावाची ७ आणि औरंगबार नावाचे एक शहर किंवा गाव आहे. यात 'औरंगाबाद खालसा', 'औरंगाबाद दालचंद' आदी प्रकारची नावेही आहेत. छावा चित्रपटाच्या माध्यमातून क्रूरकर्मा औरंगजेबाचा खरा चेहरा जगासमोर आला आहे. त्याची धर्मांधता आणि क्रूरता या चित्रपटाच्या माध्यमातून कोट्यवधी जनतेने पाहिली त्यामुळे त्याच्याविरोधात देशभरात जनक्षोभ उसळला आहे. स्वराज्याचे धाकले धनी स्वराज्यरक्षक धर्मवीर संभाजी महाराज यांची ज्या पद्धतीने हाल हाल करून हत्या करण्यात आली ते पाहता आजही या क्रूरकर्माचा अशाप्रकारे गौरव होत असेल तर ते भारतासाठी लज्जास्पद आहे. इतिहासकार आणि जाणकार यांच्या मते क्रूरकर्मा औरंगजेबाने छत्रपती




संभाजी महाराजांचे जे हाल केले त्यातील केवळ ५ टक्केच छावा चित्रपटात दाखवण्यात आले आहेत यावरून त्याचे कौर्य लक्षात येते. शहरे, गावे, वसाहती आणि मार्गांना या क्रूरकर्माची नावे आजही शाबूत असणे म्हणजे त्याचे उदात्तीकरणच असून ती त्वरित बदलली पाहिजेत. महाराष्ट्रातील औरंगाबाद शहराचे नाव बदलून महाराष्ट्र सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आता केंद्र सरकारने ही उर्वरित नावे बदलण्यासाठी पुढाकार घेऊन औरंगजेबाचे उदात्तीकरण थांबवावे !

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात रशियाने जेव्हा पोलंड जिंकला तेव्हा त्यांनी पोलंडवरील विजयाचे स्मारक म्हणून वॉर्सा शहराच्या मधोमध एक रशियन ऑर्थाडॉक्स चर्च उभे केले. पहिल्या महायुध्दानंतर जेव्हा पोलंड स्वतंत्र झाला तेव्हा पहिले काम कुठले केले असेल, तर रशियाने बांधलेले ते चर्च पाडले आणि रशियन वर्चस्वाचे चिन्ह नष्ट केले. कारण पोलंडवासीयांना ते चर्च आपल्या अपमानाची सतत आठवण करुन देत होते.' याउलट भारताला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त होऊन ७८ वर्षांहून अधिक काळ लोटला तरी देशातील अनेक जिल्ह्यांना, शहरांना, तालुक्यांना आणि गावांना दिलेली जुलमी आक्रमकांची आणि त्यांच्या वारसांची नावे पालटली गेलेली नाहीत. असे म्हटले जाते कि हजारो वर्षांपूर्वी भारतात सोन्याचा धूर निघत असे. भारताला 'सुवर्णनगरी' असेही म्हटले जात असे. भारतावर चालून आलेल्या यवनी आक्रमकांनी आणि त्यानंतर आलेल्या ब्रिटिशांनी भारताचे सारे वैभव लुटले. येथील इतिहासाच्या खुणा पुसल्या. पुरातन मंदिरांची आणि कलाकृतींची नासधूस केली. तलवारीच्या बळावर भारतीयांवर अत्याचार केले, अनेकांचे धर्मांतर केले. येथील शहरांची आणि गावांची नावे पालटली. देश स्वतंत्र होऊन आज ७८ वर्षे उलटली तरी या आक्रमकांच्या स्मृतींना आपण अद्याप जपून ठेवले आहे. पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त झालेला कोणताही देश सर्वप्रथम त्याच्यावरील आक्रमकांच्या खुणा पुसून टाकतो; मात्र भारतीय राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे आपण आजही त्या स्मृती उगाळत बसलो आहोत. आजही हिंदुस्थानातील ७०० हुन अधिक गावांना बाबर, हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजहान आणि औरंगजेब यांची नावे आहेत. प्राचीन भारतातील हिंदूंच्या सहिष्णुतेमुळे आक्रमणकर्त्यांनी येथे आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, तलवारीच्या बळावर धर्मांतरे घडवून आणली, देशाचे सारे वैभव लुटले मात्र याच भारतातील पराक्रमी राजे महाराजांनी आपल्या शौर्याने या आक्रमकांच्या कबरी इथेच खणल्या. त्यानंतर आलेल्या इंग्रजांनाही क्रांतिकारकांनी जेरीस आणून देश सोडण्यास भाग पाडले. भारतभूमी ही जशी संतांची आणि समाजसुधारकांची भूमी आहे तशी ती अधर्माच्या नाशासाठी पृथ्वीतलावर जन्म घेणाऱ्या अवतारांची, जनतेच्या कल्याणासाठी स्वतःच्या प्राणाची बाजी लावून लढणाऱ्या वीरपुरुषांची आणि भारतमातेला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी बलीवेदीवर हसतमुखाने चढणाऱ्या क्रांतिकारकांचीही आहे. ज्या भूमीला अशा उत्तुंग पराक्रमाचा दैदिप्यमान इतिहास लाभला आहे, तिने जुलमी आक्रमकांचा आणि त्यांच्या पिढीच्या नावाचा वारसा का म्हणून चालवावा ?

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# आधुनिक काळातील विज्ञानसूर्य : स्टीफन हॉकिंग !

आधुनिक काळातील विज्ञानसूर्य म्हणून ओळखले जाणारे प्रख्यात शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचा आज स्मृतिदिन. ६ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १४ मार्च २०१८ रोजी त्यांचे निधन झाले. स्टीफन हॉकिंग यांचा जन्म ८ जानेवारी १९४२ साली इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे झाला. त्यांचे वडील डॉ. फ्रँक हॉकिंग जीवशास्त्राचे संशोधक होते. स्टीफन हॉकिंग यांच्या जन्माच्या वेळी डॉ. फ्रँक आणि इसाबेल या दाम्पत्याने उत्तर लंडनहून ऑक्सफर्ड येथे स्थलांतर केले, कारण तेंव्हा दुसरे महायुद्ध चालू होते. पण काही दिवसांतच ते पुन्हा लंडनला परतले कारण त्यांचे वडील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिनमध्ये पार्सिटोलॉजी विभागाचे प्रमुख बनले होते. १९५० मध्ये हॉकिंग कुटुंबाने सेंट अल्बान्स येथे स्थलांतर केले. येथेच १९५० ते १०५३ अशी तीन वर्ष त्यांनी सेंट अल्बान्स स्कुल फॉर गर्ल्स या शाळेत शिक्षण घेतले. ही शाळा मुलींची असली तरी तिथे मुलांनाही प्रवेश दिला जात होता. स्टीफन लहानपणापासून हुशार होते. त्यांना गणित, भौतिकशास्त्र आणि संगीताची खूप आवड होती. स्टीफन हॉकिंग यांनी ऑक्सफर्ड विश्वविद्यालयात विश्व उत्पत्ती शास्त्राचे संशोधन करण्यासाठी प्रवेश घेतला, पण अवघ्या २१ व्या वर्षी अमायो ट्रॉपिक लॅटरल स्क्लोरोसिस (एएलएस) या असाध्य रोगाने त्यांना




ग्रासले. स्टीफन हॉकिंग जेमतेम दोन वर्ष जगतील असे त्यांना सांगण्यात आले. आधी ते खूप निराश झाले पण त्याच इस्पितळातील एका रोग्याला पाहून त्यांना आशेचा किरण दिसू लागला. या आजाराने त्यांना बहुविकलांगत्व आले. चालण्याफिरण्यासाठी त्यांना व्हीलचेअरचा आधार घ्यावा लागला. मग व्हील चेअरवर एक संगणक जोडण्यात आला. फक्त एक बोट वापरुन ते संगणकावर काम करू लागले. १९८५ साली त्यांना न्यूमोनिया झाला. त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात आली या शस्त्रक्रियेनंतर त्यांचा आवाजही गेला पण त्यांनी हार मानली नाही. दुर्दम्य इच्छाशक्ती, सकारात्मकता, कार्यमग्नता आणि जीवनाविषयीचे प्रेम या गुणांच्या जोरावर त्यांनी दुर्धर आजारावर मात करीत कृष्णविवरासंदर्भात अनेक संशोधन करुन जगाला अचंबित केले. कृष्णविवरासंदर्भात त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्या ब्रिफ हिस्ट्री ऑफ टाईम या पुस्तकाने अनेक विक्रम केले. या पुस्तकावर आधारित अनेक मालिका व चित्रपट निघाले. रॉजर पेनरोज या सहकाऱ्याच्या मदतीने त्यांनी सापेक्षतेवादाच्या सिद्धांतावर आधारित अवकाश व काळाची सुरवात बिगबँगमध्ये झाली असेल तर कृष्णविवरात शेवट असेल असा सिद्धांत मांडला. कृष्णविवरे काळी नसतात. कृष्णविवरे उत्सर्जन करतात. ब्रह्मांडाला कोणतीही सीमा नाही असे सिद्धांत त्यांनी मांडले. त्यांची अनेक संशोधने ही काळाच्या पुढची होती. म्हणून त्यांना आधुनिक काळातील न्यूटन असे म्हणतात. स्टीफन हॉकिंग यांचे जीवनचरित्र प्रेरणादायी व स्तिमित करणारे आहे. काळाच्या पुढे असणारा हा शास्त्रज्ञ आधुनिक काळात होऊन गेला, ही गोष्ट पुढील पिढीला स्तिमित करणारी ठरेल. स्टीफन हॉकिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## महाराष्ट्राचे कर्ज गेले ११ लाख कोटीवर...




राज्याचा २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प नुकताच विधानसभेत सादर करण्यात आला. त्यात एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. २०२१-२२ मध्ये महाराष्ट्रावर केवळ ५.७६ लाख कोटीचे कर्ज होते. ते वाढत वाढत आता २०२६ मध्ये तब्बल ११ लाख कोटी रुपयांहून अधिक झाले आहे. या कर्जामुळे आपण विकासावर जास्त खर्च करू शकत नाही हे वास्तव आहे. लोकोपयोगी योजना जाहीर करून लोकप्रियता मिळविणे व निवडणुका जिंकणे हेच काम आता देशातील सर्वच पक्ष करत आहेत. कालच पंजाबमध्ये लाडकी बहीण सारखी एक योजना जाहीर करण्यात आली त्यानुसार त्या राज्यातील महिलांना दरमहा रक्कम मिळणार आहे. पंजाब मध्ये निवडणूक लवकरच होणार आहेत त्याचे हे सूचक आहे. काही दिवसापूर्वी सुप्रीम कोर्टाने या लोकप्रियतेच्या योजनेवर टीका केली होती. देशातील अनेक राज्ये निवडणुकांआगोदर लोकप्रियतेच्या योजना जाहीर करून मते मिळवीत आहेत. साहजिकच त्यामुळे राज्यावर कर्जाचा बोजा वाढत आहे. अशा लोकप्रिय योजनेमुळे लोकांची क्रयशक्ती कमी होत चालली आहे .विधानसभेत जयंत पाटील यांनी राज्याच्या कर्जावर टीका केली आहे. एकूणच हे कर्ज कसे कमी होणार? त्यासाठी सरकारची काय योजना आहे? हे प्रश्न सामान्य माणसाला पडत आहेत.

**- शांताराम वाघ, पुणे.**

## नवोध्याय

गरज पडेलं कधीही
शोधत रहावे पर्याय
व्याधी जडणे आधी
निवडून ठेवा उपाय

आग लागल्यावरती
पाणी हुडकती पाय
जळून जाते पालवी
सांगा उपयोग काय

धग धग धगते अशी
दुरुनही जाणते हाय
तपासूनपाहे औषध
झाल्या नंतर अपाय

प्रवासाजाण्याआधी
शोधा कुठे ती सराय
शिदोरी हवी साथीस
कधीही येई अंतराय

शाळेतउशीरा भरती
आधी शिकवते माय
खळाळा उकळे दुध
तेंव्हा स्निग्धमयसाय

अवचित येई आपत्ती
करुन टाके निरुपाय
शरणागतीसंकटापुढे
नुरतो मग तरणोपाय

पूर्व नियोजन नसता
होई हतबल असहाय
विचार सिमा पल्याड
राखनीत अचिरकाय

**-- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# गावोगावी वाजवा भोंगा अभ्यासाचा !

गावाच्या शाश्वत विकासासाठी आणि समस्त गावकऱ्यांच्या हितासाठी गावोगावी वेगवेगळे ठराव मंजूर करण्यात येत आहेत. असा ठराव घेऊन काही गावांनी गावातील दारू पूर्णतः हद्दपार केली,काही गावांनी शिव्या देण्यावर बंदी घातली आहे. सौंदाळा गावातील गावकऱ्यांनी तर बहुमताने ठराव मंजूर करून गावातून जातीला कायमचे तडीपार केले आहे. असे ठराव चर्चेचे ठरत आहेत तितकेच लक्षवेधक कामगिरी करत आहेत. गावोगावी असाच ठराव मंजूर करून दररोज सायंकाळी अभ्यासाचा भोंगा वाजवला पाहिजे. भोंगा वाजल्या बरोबर प्रत्येक घरातील मोबाईल, संगणक,साऊंड सिस्टीम,टी.व्ही. ही उपकरणे तीन तास बंद ठेवून प्रत्येक घरातील मुलेमुली एकाग्रतेने अभ्यासाला बसलेच पाहिजेत.



सध्याचे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे.घरोघरी मोबाईल, रेडिओ, संगणक, लॅपटॉप,टी.व्ही.अशा इलेक्ट्रॉनिक साधनांनी मनुष्याला गुलाम केले आहे. घरातील बहुतांश व्यक्ती मोबाईलच्या स्क्रीनवर रमतात, लहान मुले वेगवेगळे गेम्स खेळतात, रूण मुले मुली रील्स, इन्स्टा, फेसबुक ह्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. ज्या वयात अभ्यास करून जीवनाचे सोने करायचे असते त्या वयात आजची पिढी मोबाईलमध्ये गरजेपेक्षा जास्त वेळ वाया घालवत आहे. मोबाईलवर चॅटिंग करणे, नको ते पाहणे, ऑनलाईन गेम्स खेळणे हे प्रकार वाढले आहेत. यामुळे मैदानी खेळाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. मोबाईलच्या नादात फास्टफूड खाण्याचे प्रमाण वाढले आहे. याचा परिणाम होऊन नवीन पिढी बेढब, जाडजूड, स्थूल शरीराची बनली आहे. रोग होऊन आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. एकेकाळी एका अविद्येने समाजाचे व देशाचे अतोनात नुकसान केले होते असे महात्मा फुलेंनी समजावून सांगितले होते.आणि आज एका मोबाईलने कित्येक पिढ्या बरबाद करण्याचा विडा उचलला आहे. केवळ मोबाईलच्या नादामुळे घरोघरच्या मुलामुलींनी अभ्यास करणे सोडून दिले आहे. फक्त शाळा कॉलेजला जायचे, वर्गात बसायचे, मोबाईलचा वेध लावून आभासी दुनियेत रमायचे हेच सध्या घडत आहे. यामुळे अनेक कुटुंबांचे, समाजाचे व देशाचे अतोनात नुकसान होत आहे. मोबाईलमुळे सामाजिक,कौटुंबिक वातावरण बिघडले आहे. मोबाईलच्या नादाने मुलेमुली बिघडली आहेत, पार वाया गेली आहेत म्हणून सगळे पालक चिंता करून झुरत आहेत. ही समस्या सर्वांचीच डोकेदुखी झाली आहे.

हे सगळं बंद करायचे असेल, मुलामुलींना अभ्यासाची सवय लावायची असेल आणि त्यांचे जीवन घडवायचे असेल तर गावोगावी ग्रामसभेत ठराव मंजूर करून संध्याकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रत्येक घरातील मोबाईल, संगणक, लॅपटॉप, साऊंड सिस्टीम अशी मनोरंजनाची सगळी साधने बंद म्हणजे बंद करून मुलां मुलींना अभ्यासाला सक्तीने बसवले पाहिजे. या कालावधीत गावभर शांतता राहील आणि सगळ्या घरातील मुलेमुली एकाग्रतेने अभ्यास करताहेत की नाही हे पाहण्यासाठी एक अभ्यास दक्षता समिती बनवायला हवी. सगळ्या गावकऱ्यांनी एकत्र येऊन हे करायलाच हवे. समस्त गावकऱ्यांनी स्वार्थ, अहंकार व गर्व बाजूला ठेवून विद्यार्थ्यांच्या हितासाठी, नवीन पिढीच्या भल्यासाठी आणि गावासाठी व देशासाठी हे सकारात्मक पाऊल उचलणे काळाची गरज बनली आहे. सर्व पालकांनीही आपल्या घरांतील मोबाईल व इतर मनोरंजनाची सर्व साधने बंद ठेवण्याचा निर्णय आजच घेतला पाहिजे. शिक्षणाने पिढी घडते, शिक्षणानेच व्यक्तीचा उध्दार होतो, हे लक्षात घेऊन प्रत्येक आईवडिलांनी आपल्या लेकरांना दररोज अभ्यासाला बसवलेच पाहिजे.विद्यार्थी दशेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अठरा अठरा तास अभ्यास केला. त्यांचा आदर्श आपल्या लेकरांनी घेतला पाहिजे. म्हणून प्रत्येक गावात रोज सायंकाळी अभ्यासाचा भोंगा वाजला पाहिजे.गावोगावी अभ्यासाठी भोंगा वाजणे काळाची नितांत गरज बनली आहे.

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

## घरगुती गॅस उपलब्ध असल्याने, साठा करून न ठेवण्याचे आवाहन



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेला औद्योगिक व व्यावसायिक गॅसचा तुटवडा तात्पुरता असून डोमेस्टिक अर्थात घरगुती गॅस सिलेंडर पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत याची नागरिकांनी नोंद घ्यावी. यामुळे नागरिकांनी अस्वस्थ होऊन घाबरून न जाता गॅस सिलेंडरचा साठा करून ठेवू नये असे सूचित करण्यात येत आहे.

डोमेस्टिक घरगुती वापरासाठीचा गॅस पुरवठा (पीएनजी/एलपीजी) सुरळीत राखण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जात असून रुग्णालयातील रुग्णांसाठीचे व शालेय पोषण आहारासाठीचे जेवण बनवण्यासाठीही गॅस पुरवठा सुरळीत राहील याकडे प्राधान्याने लक्ष दिले जात आहे.

तरी नागरिकांनी गॅस सिलेंडरचा पुरवठा करून ठेवू नये व कोणत्याही अफवांना बळी पडू नये आणि अधिकृत विश्वासार्ह माहितीवरच विश्वास ठेवावा असे आवाहन नवी मुंबई महानगर पालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

याबाबत काही अडचण भासल्यास नवी मुंबई महानगरपालिकेच्या १८००२२२३०९ या टोल फ्री क्रमांकावर २४ ÷ ७ संपर्क साधावा तसेच याकडे ठाणे जिल्हास्तरीय शिधावाटप कार्यालयाकडूनही बारकाईने लक्ष देण्यात येत असून जिल्हा शिधावाटप कार्यालयातील अधिकारी प्रशांत काळे (संपर्क- ९१५८८८३६४४) अथवा नवी मुंबई शिधावाटप कार्यालयातील अधिकारी छाया पालवे (संपर्क - ९९६७९१३८९१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# काळू धरण कदापि होऊ देणार नाही, चासोळे येथील महिला मेळाव्यात महिलांचा ठाम निर्धार

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१३, शहापूर (ठाणे) :** जागतिक महिला दिन आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले स्मृतिदिनानिमित्त मुरबाड तालुक्यातील चासोळे येथील श्रीक्षेत्र हटकेश्वर मंदिर परिसरात शेतकरी महिलांचा हक्क मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात परिसरातील शेकडो शेतकरी व शेतमजूर महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत काळू धरण प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला.

शेतकरी व शेतमजूर महिलांच्या विविध प्रश्नांवर जनजागृती करण्याच्या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपस्थित महिलांनी आपले मनोगत व्यक्त करताना काळू धरणामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत चिंता व्यक्त केली.

मेळाव्याचे नेतृत्व श्रमिक मुक्ती संघटनेच्या ॲड. इंदवीताई तुळपुळे यांनी केले. कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्या नंदा उघडा, साधना वैराळे आणि ॲड. दिव्या ठाकूर यांनी महिलांना मार्गदर्शन करताना महिलांनी आपल्या हक्कांसाठी एकत्र येण्याची गरज अधोरेखित केली.

मेळाव्यात विविध जनजागृतीपर गीते सादर करण्यात आली. विशेषतः बाई मी धरण बांधिते हे गीत सादर झाल्यानंतर उपस्थित महिलांच्या डोळ्यात अश्रू तरळले आणि वातावरण भावूक झाले.



यावेळी बोलताना महिलांनी कोणत्याही परिस्थितीत काळू धरण होऊ देणार नाही असा ठाम निर्धार व्यक्त केला. धरणामुळे शेती, घरे आणि स्थानिक पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांची माहिती देत ॲड. इंदवीताई तुळपुळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

दरम्यान, मेळाव्यातील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग आणि काळू धरणाविरोधातील ठाम भूमिका पाहता शासनाला हा प्रकल्प राबवणे आता कठीण होईल, असे मत काळू धरण संघर्ष समितीचे कार्यकर्ते विनोद राऊत यांनी व्यक्त केले.

या मेळाव्यात परिसरातील शेतकरी महिलांच्या विविध समस्या आणि हक्कांबाबतही चर्चा करण्यात आली. महिलांच्या एकजुटीने आणि ठाम भूमिकेमुळे काळू धरण प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

## ठाण्यात 'मॉडेल करिअर सेंटर' व 'लाईट हाऊस' कौशल्य विकास केंद्राचे दिमाखदार उद्घाटन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, ठाणे :** युवकांना गुणवत्तापूर्ण कौशल्य प्रशिक्षण, करिअर मार्गदर्शन आणि रोजगाराच्या आधुनिक संधी एकाच छताखाली उपलब्ध करून देणे, ही आजच्या काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे आणि 'लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन करण्यात आलेल्या 'मॉडेल करिअर सेंटर (एमसीसी) ठाणे लाईट हाऊस कौशल्य विकास केंद्राचे' उद्घाटन आज त्यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

या सोहळ्याला जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अनिल सदाफुले, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त संध्या साळुंके, लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशनचे चेअरमन डॉ. गणेश नटराजन, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुजा के. बन्सल, मुख्य प्रकल्प अधिकारी अमृता बहुलकर आणि सहसंचालक अतुल माने प्रामुख्याने उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी बदलत्या पिढीच्या मानसिकतेवर भाष्य केले. ते म्हणाले, पूर्वी पिढी बदलण्यासाठी २५-३० वर्षांचा काळ लागायचा, मात्र आता तंत्रज्ञानामुळे अवघ्या १०-१५ वर्षांतच वैचारिक तफावत जाणवू लागली आहे. आजच्या तरुणाईमध्ये अध्यात्माकडे कल वाढणे ही सकारात्मक बाब आहे, मात्र व्यावसायिक जगात टिकण्यासाठी केवळ पदवी पुरेशी नाही. 'डिमांड असेसमेंट' करून बाजारातील मागणीनुसार स्वतःला अपडेट ठेवणे आवश्यक आहे.




जिल्हाधिकाऱ्यांनी विशेषतः न्यूट्रिशनिस्ट आणि फिजिओथेरपिस्ट या क्षेत्रांतील वाढत्या संधींचा उल्लेख करून युवकांना प्रोत्साहन देत पुढे नमूद केले की, सिन्सिरिटी, डेडिकेशन आणि चौकस बुद्धीच्या जोरावर तरुण उत्तम प्रगती करू शकतात.

**केंद्राविषयी थोडक्यात...**

महाराष्ट्र शासनाचा कौशल्य विकास विभाग, लाईट हाऊस कम्युनिटीज फाउंडेशन आणि युबीएस संस्थेच्या आर्थिक सहकार्यातून हे केंद्र साकारले आहे.

सुमारे १ हजार ५०० चौरस फूट क्षेत्रफळात पसरलेल्या या केंद्रात कट्टा, खजाना, टेक हब, पाठशाळा आणि समुपदेशन कक्ष अशा जागतिक दर्जाच्या सुविधा आहेत.

१५ फेब्रुवारी २०२४ पासून कार्यरत असलेल्या या केंद्रात आतापर्यंत ६ हजार ५०० युवकांनी नोंदणी केली असून ८०० युवकांनी कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे, त्यापैकी ७५० युवकांना नामांकित कंपन्यांमध्ये रोजगार मिळाला आहे.

प्रशिक्षणार्थी युवकांना किमान १२ हजार ८६९ रुपयांपासून ते कमाल ४५ हजार रुपयांपर्यंत मासिक वेतन मिळत आहे.

या केंद्रामध्ये ई-व्हेईकल, ड्रोन तंत्रज्ञान, ग्राफिक डिझायनिंग, डिजिटल मार्केटिंग, लॅपटॉप रिपेअरिंग, ऑफिस एक्झिक्युटिव्ह, सर्टिफाइड पर्सनल ट्रेनिंग आणि फूड अँड न्यूट्रिशन यांसारखे ३० पेक्षा अधिक उद्योगसुसंगत कोर्सेस उपलब्ध आहेत.

या कार्यक्रमादरम्यान एका विशेष पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले, तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहायक आयुक्त संध्या साळुंके यांनी केले.

## दि.पाटण अर्बन बँकेच्या वतीने धनंजय काटे यांचा सत्कार



**अक्षराज: सुरेश संकपाळ**

**दि.१३, पाटण :** दि.पाटण अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेड पाटणचे माजी उपाध्यक्ष धनंजय ताटे यांची तांबवे, जिल्हा परिषद गटातून जिल्हा परिषद सातारा येथे सदस्य पदी निवड आल्याबद्दल दि.पाटण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड पाटण यांच्यावतीने बँकेचे अध्यक्ष चंद्रकांत कापसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी दि.पाटण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड पाटण बँकेचे उपाध्यक्ष दिलीपराव मोटे, बँकेचे संचालक दिनकरराव घाडगे, अंकुश मुंडे, वंदना सावंत, ॲड.ए.पी. पाटील ज्येष्ठ संचालक, रामचंद्र पानसकर, बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंट समितीचे अध्यक्ष गिरीष कुमार पवार, दि.पाटण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माधव कपिलेश्वर, दि.पाटण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापक के.आर.शिंदे, व दि.पाटण को-ऑपरेटिव्ह बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

धनंजय ताटे सत्कार प्रसंगी बोलताना म्हणाले, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर व सातारा जिल्हा बँक संचालक सत्यजितसिंह पाटणकर यांनी मला सुपने गटातून उमेदवारी देऊन माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे. त्या विश्वासाला मी पात्र राहून सुपने गटात विकास कामे करण्याचा प्रयत्न करीन. तसेच मला सुपने गटातून मतदार बंधू बहिणीने निवडून दिल्याबद्दल मी त्यांच्या ऋणात राहणे पसंत करीन.

## कोळसा प्रकल्पातील जमीन गमावलेल्या कुटुंबातील नातीला नोकरीसाठी पात्र ठरविणारा ऐतिहासिक निर्णय

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, राजुरा (चंद्रपूर) :** प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या अधिकारांना बळकटी देणाऱ्या एका महत्त्वपूर्ण निर्णयात मुंबई उच्च न्यायायलायच्या नागपूर खंडपीठाने असा ऐतिहासिक निकाल दिला आहे की, मूळ जमीनमालकांच्या नातींना केवळ कुटुंब या संकल्पनेच्या अरुंद व्याख्येत त्या बसत नाहीत या कारणावरून पुनर्वसन व पुनर्स्थापन धोरणाअंतर्गत नोकरी नाकारता येणार नाही. न्यायमूर्ती अनिल किल्लोर व न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठाने तानेबाई नारायण अडवे व यशश्री सुरेश अडवे विरुद्ध कोअल इंडिया लिमिटेड चेअरमन कोलकाता वेकोली चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक नागपूर आणि क्षेत्रीय अधिकारी राजुरा या प्रकरणात हा महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे.

न्यायालयाने १० जुलै २०२५ रोजी कोळसा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी जमीनमालकाच्या नातीला नोकरी नाकारत दिलेले पत्र रद्दबातल ठरवून, संबंधित धोरणानुसार तिच्या नोकरीच्या मागणीचा पुन्हा विचार करण्याचे निर्देश दिले.

या प्रकरणात जमीन गमावलेल्या शेतकरी कुटुंबातील आजी व नात यांच्या वतीने ॲड. दीपक चटप यांनी उच्च न्यायालयात बाजू मांडली. त्यांनी न्यायालयात ठामपणे युक्तिवाद केला की, नातीला नोकरी नाकारणे हे मनमानी, भेदभावपूर्ण व लिंगसमतेच्या तत्त्वांचे उल्लंघन करणारे आहे. कुटुंबाची जमीन कोळसा खाण प्रकल्पासाठी अधिग्रहित झाल्यानंतर पुनर्वसनासाठी देण्यात



येणाऱ्या नोकरीचा लाभ केवळ पुरुष वारसाला देऊन नातीला नाकारणे हे स्पष्ट लिंगभेद ठरते. कोळसा कंपन्यांच्या वतीने ॲड. सी. एस. समुद्रे यांनी बाजू मांडली. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर माननीय न्यायालयाने ॲड. दीपक चटप यांच्या युक्तिवादाशी सहमती दर्शवत केवळ नात असल्याच्या कारणावरून नोकरी नाकारणे हे कायद्याच्या विरोधात असल्याचे स्पष्ट केले.

या निर्णयाकडे कोळसा खाण क्षेत्रातील हजारो प्रकल्पग्रस्त कुटुंबांसाठी महत्त्वपूर्ण कायदेशीर विजय म्हणून पाहिले जात आहे. अनेक प्रकरणांमध्ये जमीनमालकांच्या नातींचे अर्ज तांत्रिक कारणांवरून नाकारले जात होते. निर्णयानंतर बोलताना ॲड दीपक चाटप यांनी सांगितले की, हा निर्णय पुनर्वसन धोरणांची अंमलबजावणी करताना भेदभाव न करता समानतेच्या तत्त्वांचे पालन करण्याचा स्पष्ट संदेश देतो. कायदेविशेषज्ञांच्या मते, हा निर्णय दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो आणि विस्थापित कुटुंबांना मिळणारे पुनर्वसनाचे लाभ न्याय्य, समान व लिंगभेदाशिवाय देण्याच्या तत्त्वाला बळ देणारा आहे.

## वाघाच्या हल्लयात मेंढपाळ ठार मानव-वन्यजीव संघर्ष पेटला !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात मानव- वन्यजीव संघर्षाच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. १३ मार्चला मध्यरात्री पोंभूर्णा वनपरिक्षेत्रात मेंढपाळावर वाघाने हल्ला करीत ठार केले. यावेळी कुटुंबाने आरडाओरडा केला मात्र, मेंढपाळाचा जीव वाचू शकला नाही. जानेनारी ते मार्च या कालावधीमधील ही ८ वी घटना आहे. ज्यामध्ये ७ वाघाच्या तर एकाचा बिबट्याच्या हल्लयात मृत्यू झाला आहे. मूल तालुक्यातील वनपरिक्षेत्र पोंभूर्णा मधील फिस्कुटी गावात जुनासुर्ला मधील मेंढपाळ ३६ वर्षीय वासुदेव गणपत कंकलवार हे नेहमीप्रमाणे जनावरे चराईसाठी नेत होते. १२ मार्चला जनावरे चराईसाठी नेल्यावर रात्रीच्या सुमारास रामदास जेंगठे यांच्या शेतात महाकाली मंदिराजवळ मेंढ्याची लाग बसवून झोपले होते. यावेळी भाऊ मारोती कंकलवार व त्याची पत्नी वनिता कंकलवार देखील उपस्थित होत्या.

मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास अचानक जनावरांचा आवाज आल्याने वासुदेव जागे झाले. ते बघण्यासाठी जनावरांकडे गेले असता बाजुलाच दबा धरुन बसलेल्या वाघाने वासुदेव यांच्यावर झडप घालत त्यांच्यावर हल्ला चढविला. भाऊ जागा झाल्याने त्यांनी आरडाओरडा केला, वाघ जंगलाच्या दिशेने पळाला मात्र तोवर वासुदेव चा मृत्यू झाला होता.

याबाबत पोलीस व वनविभागाला माहिती देण्यात आली. पंचनामा करीत मृतदेह मूल उपजिल्हा रिग्णालयात दाखल करण्यात आला. वनविभागाने तातडीची मदत म्हणून मृतकाच्या कुटुंबाला ५० हजाराची मदत दिली.

## गॅस सिलेंडर दरवाढ व तुटवडा विरोधात बल्लारपुरात आक्रोश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, विसापूर (चंद्रपूर) :** केंद्र सरकारच्या नियोजनशून्य कारभारामुळे सामान्य जनतेला त्रासाला सामोरे जावे लागत आहे. आधिच जनता महागाईने होरपळली आहे. अशातच गॅस सिलेंडरची दरवाढ करुन तुटवडा निर्माण केल्याने गंभीर समस्या आली आहे. हा प्रकार म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळणे आहे. गॅस सिलेंडर दरवाढ कमी करा व गॅस सिलेंडरचा तुटवडा मागे घ्या, या मागणीसाठी गुरूवार (दि.१२) रोजी बल्लारपूर शहर व तालुका कांग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी धरणे आंदोलन करून व आक्रोश मोर्चा काढून तहसीलदार रेणुका कोकाटे यांच्या मार्फत केंद्र सरकार ला निवेदन सादर केले. यावेळी नगराध्यक्ष डॉ. अलका वाढई, जेष्ठ कॅांग्रेसच्या नेत्या डॉ. रजनी हजारे, शहर कांग्रेसचे अध्यक्ष अब्दुल करीम, तालुका अध्यक्ष गोविंदा उपरे, महिला कॅांग्रेसच्या अध्यक्ष अफसाना सय्यद, युवक काँग्रेस अध्यक्ष नरेश गंडपल्ली, दिलीप माकोडे, सुनंदा आत्राम, छाया मडावी, डॉ.सुनील कुल्दीवार, डॉ.अनिल वाढई, नासिर खान, भास्कर माकोडे, नगरसेवक करुणा रेब्बावार, वैशाली हुमने, अंकुबाई बुक्या, प्रियंका थुलकर, वैष्णवी जुमडे, शिल्पा चुटे, भारत थुलकर, दिपक धोपटे, नरसिंग रेब्बावार, अनिल खरतड, डेव्हिड कामपेल्ली, डॉ. युवराज भसारकर, महमुद पठाण, प्रितम पाटील, अजय दुपारे, हेमंत मानकर, वासुदेव येरगुडे, शंकर आलाम, राजू मेश्राम, वर्षा दानव, साबिर शेख,फारूख शेख, नौशाद शेख, हरीश पवार, अजित पडवेकर, शंकर माने यांच्या सह शेकडो कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.

## ।। ग्राहक संरक्षण कायदा आणि ग्राहक ।।

कस्टमर ईज किंग (ग्राहक राजा आहे.),किंवा कस्टमर ईज गॉड.(ग्राहक देवआहे) अशी विशेषण ग्राहकाला लावली जातात.आणि दुसरीकडे अनेक प्रलोभन दाखवून ग्राहकांना आपल्या मालाचे,वस्तूंच्या खपासाठी आकर्षित केले जाते,आणि जाळ्यात ओढले जाते.आणि बऱ्याचदा अशा प्रलोभनांना ग्राहक बळी प।।।तो. त्यातच त्याची फसवणूक केली जाते.पॅन्ट वर शर्ट मिळणार अगदी फुकट .साडीवर साडी मिळणार अगदी फुकट.बाय वन गेट वन,एक वस्तू खरेदी केली तर एक फुकट,तर कधी विशिष्ट रकमेचा माल खरेदी केला तर कुपन मिळेल, त्याची सोडत निघणार त्यात हमखास बक्षिस मिळणारच. सोने खरेदीवर चांदीचे नाणे,किंवा गिफ्ट मिळणार, फ्लॅट खरेदीवर टू व्हीलर मिळवा,अश्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर केल्या जातात आणि त्यालाच तुम्ही आम्ही भुलतो,आणि फसवणूक होते.

आज आपण बाजारपेठेत नजर टाकली तर जिकडे तिकडे आपल्याला मालाच्या जाहिरातीच जाहिराती बघायला मिळतात. कुठे मोठ्या प्रमाणावर अनेक वस्तूंचा सेल लागलेला असतो आणि त्यासोबत बक्षिसेही दिली जातात. एकूणच सध्याचा काळ हा स्पर्धेचा आहे, तसा जाहिरातीचाही आहे. जो तोआपला उत्पादित माल बाजार पेठेत कसा जास्त विक्री होईल या प्रयत्नात असतो. वर्तमानपत्राची बरीच पाने जाहिरातीने व्यापलेली असतात.

ग्राहक दिन साजरा करण्या मागचा उद्देश बघितला तर ग्राहकाची फसवणूक होवू नये,सेवा पुरवताना हलगर्जीपणा होवू नये म्हणून ग्राहकाला ग्राहक कायद्याची माहीती करुन द्यावी हाच मुळ उद्देश आहे.

१९६० मध्ये अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीत ग्राहक चळवळीचा मुद्दा उपस्थित झाला होता.अध्यक्ष केनेडी यांनी ग्राहकांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी एक व्यासपीठ तयार केल.जागतिक पातळीवर पाठपुरावा केला गेला,त्याला युनेस्को कडून मान्यता मिळाली. आणि तदनंतर दरवर्षी १५ मार्च हा दिवस, जागतिक ग्राहक दिन म्हणून साजरा करण्याची प्रथा आहे.सर्वत्र तो साजरा केला जातो.

आपल्या देशात २४ डिसेंबर १९८६ मध्ये राष्ट्रपतींनी ग्राहक हक्क संरक्षण कायद्याला मंजुरी दिली.तेव्हा पासून ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. व २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकास सहा प्रकारचे हक्क प्राप्त झाले आहेत.प्रत्येक ग्राहकास आपले हक्क माहीत असतील तर त्याची फसवणूक होणार नाही.

**काय आहे हे हक्क?**

१) सुरक्षेचा हक्कः- एखादी वस्तू खरेदी करतो,तेव्हा त्या वस्तूच्या सुरक्षिततेची हमी उत्पादकानी घेणे आवश्यक असते.जसे फ्रीज. टी.व्ही.वॉशिंग मशिन.मोटर बाईक,कार, फ्लॅट, कुठल्याही वस्तू.

२) माहितीचा हक्कः-आपण खरेदी करत असलेल्या वस्तूंच्या गुणवत्ते बद्दल माहिती विक्रेत्याने ग्रहकांना देणे बंधनकारक आहे.त्यात फसवणूक करु नये.

३) निवड करण्याचा हक्कः-विक्रेता एकाच प्रकारचे उत्पादन, वा ब्रॅन्डचा आग्रह करु शकत नाही.निवडीचा अधिकार ग्राहकांना आहे.

४) म्हणणं मांडण्याचा हक्कः- ग्राहकाला आपली फसवणूक झाली वाटत असेल तर आपले म्हणणे,योग्य न्यायासाठी मांडण्याचा हक्क आहे.

५) तक्रार करण्याचा, तसेच तिचे निवारण्यासाठीचा हक्कः- फसवणूक झाली असेल तर,न्यायासाठी तक्रार निवारण करुन घेण्यासाठी ग्राहक मंच,राज्य ग्राहक परिषदेत जाण्याचा हक्क आहे.

६) ग्राहकांचे हक्का विषयी शिक्षणाचा अधिकार. हक्कः- ग्राहकांना हक्क कर्तव्ये माहिती नसल्यामुळे बाजारपेठत फसवणूक होते,ते समजण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शासनाचे कडून जागो ग्राहक जागो सारखे उपक्रमा द्वारे प्रबोधन केले जाते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वैद्यकीय सेवा या सेवेच्या व्याख्येत येतात आणि डॉक्टरांना ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत जबाबदार धरले जाऊ शकते. सुधारित ग्राहक संरक्षण विधेयक ३० जुलै २०१९ लोकसभेत व सहा ऑगस्ट २०१९ राज्यसभेत मंजूर झाले.

९ ऑगस्ट रोजी राष्ट्रपतींची सही झाल्यावर २० जुलै रोजी ते लागू झाले, आता जिल्हा आयोग व राज्य आयोग अशी रचना आहे. जिल्ह्यात एक कोटी पर्यंत, राज्य दहा कोटी पर्यंत, व त्यावरील केंद्रीय आयोगाकडे दावे असतील. नवीन कायद्यात ऑनलाइन व टेलीशॉपिंग कंपन्यांचा समावेश आहे. खाद्यपदार्थ व पेय यात भेसळ असल्यास तुरुंगवास दंडाची तरतूद आहे. तक्रार कुठेही दाखल करता येते. दिशाभूल करणाऱ्या चुकीच्या जाहिराती देणारे आणि प्रसारीत करणाऱ्यांना दंड करण्याचा आयोगाला अधिकार आहे. दोन वर्षे तुरुंगवास व पन्नास लाख दंडाची तरतूद आहे.

ग्राहकांची फसवणूक झाली असेल तर त्याला न्याय हा मिळतोच, पण आपल्या हक्का सोबतच काही कर्तव्ये आहेत याची जाणीव सुद्धा ग्राहकांनी ठेवायला हवी.

**काय आहे ती कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या?**

**कर्तव्ये आणि जबाबदारी**

- बाजारपेठेत एका उत्पादनासाठी अनेक उत्पादक असतात.त्यात स्पर्धा ही असणारच. फसव्या जाहिरातीला ग्राहकाने बळी पडू नये.

- बऱ्याचदा धमाका सेल ऑनलाईन खरेदीवर असतात,सणवारालाही डिस्काउंट सेल असतात, अशा वेळी न खपलेला,किंवा काही दोष असलेला माल असू शकतो.सावधपणे खरेदी करावी.

- खरेदी करतांना मालाचे बिल आवश्यक आहे.बिलाचा आग्रह धरावा.न दिल्यास विक्रेत्याची तक्रार करावी.कारण माल दोषयुक्त असेल तर बिलाशिवाय आपण काहीच करु शकत नाही.

-एम.आर.पी.(मॅक्झीमम रिटेल प्राईज) पेक्षा जास्त किंमत देऊ नका.खरेदी करतांना ती बघा.

षवस्तूंची मुदत तपासा.(एक्सपायरी डेट) ती संपली असेल तर वस्तू नाकारावी.अशा वस्तूचा वापर हानिकारक ठरु शकतो.

- पेट्रोल भरतांना मीटरवर शून्या कडे लक्ष द्या.शुध्दते विषयी शंका असल्यास पुरवठा निरीक्षक,तहसीलदार यांचेकडे तक्रार करा.

- सोने खरेदी वेळी हॉलमार्क कडे लक्ष द्या.

- ऑनलाईन खाद्य पदार्थ मागवताना योग्य काळजी घ्या. पदार्थ खराब आढळून आल्यास ताबडतोब तक्रार करावी.

ग्राहकांना योग्य तो न्याय मिळावा म्हणून जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहकआयोग व राज्य पातळीवर राज्य ग्राहक आयोग कार्यरत आहेत. विनाशुल्क आपण तक्रार दाखल करु शकतो. केन्द्रात राष्ट्रीय ग्राहक आयोग आहे. तर राज्यातील दुर्गम भागात ग्राहक उपाययोजनांसाठी ग्राहक कल्याण सल्लागार समिती आहे. याव्यतिरिक्त जागो ग्राहक जागो व कंझुमर क्लब आहेत.

गावपातळीवर ग्राहकांसाठी ग्राहक सेवा संस्था, ग्राहक पंचायत,प्रवासी संघ,कार्यान्वित आहेत. ग्राहकांवर अन्याय होऊ नये म्हणून त्या कार्य करतात.प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक तक्रार निवारण समिती आहे.या समितीत विविध विभागातील सदस्यांची निवड केली जाते. शासकिय सदस्य + अशासकिय सदस्य असतात.

काही वर्षांपासून शासनात ग्राहक संरक्षण विभागाची निर्मिती केली आहे.त्यासाठी स्वतंत्रपणे मंत्र्याची नेमणूक केली जाते.

शहरी,ग्रामीण भागात ग्राहकाचे हक्का रक्षण होणे त्याला न्याय मिळवून देण्यासाठी व्यवस्था असली तरी ग्राहकास खूप काळ न्यायासाठी ताटकळत बसावे लागते. अनेक ठिकाणी जिल्हा ग्रा.मंचावर अध्यक्ष नसतात. त्यांच्या नेमणूका लवकर होत नाही, तर कधी मंचाचे सदस्य नसतात.नव्वद दिवसांत न्याय मिळण्याचा हेतू साध्य होत नाही.शासनाचे दुर्लक्षच म्हणावे लागेल.

ग्राहकांच्या वाढत्या फसवणूकिचे प्रकाराला आळा बसावा म्हणून केन्द्र सरकारने जागो ग्राहक जागोअभियान सुरु केले आहे. बँका, सार्वजनिक वितरण, वीज,बांधकाम, अन्नौषध, पर्यटन, पोस्ट,अशा विविध प्रकारच्या खात्याच्या तक्रारी ह्या अभियानाच्या हेल्पलाइन(मदत सेवा प्रणाली) वर ग्राहक करु शकतो. जागतिक ग्राहक दिन, राष्ट्रीय ग्राहक दिनाचे शासकिय पातळीवरून आयोजन केले जाते.त्यात औपचारिकता असते. काहीच ठिकाणचे अपवाद सोडले तर बहुतांशी उदासीनता असते.कार्यक्रमा संबंधित प्रसार, प्रचार व्हावा तो होत नाही.ठरावीकच लोकांना पत्रिका वाटून कार्यक्रम होतात. ज्यांना पत्रिका जातात ते कोणिही कार्यक्रमात नसतात.ही सत्यता आहे. कार्यक्रमास ग्राहकांची उपस्थिती चा अभाव असतो. बऱ्याचदा तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी, वेंडर, स्वस्तधान्य दुकानदार हेच उपस्थित असतात.दहापंधरा लोकांच्या उपस्थितीत कार्यक्रम उरकून घेतला जातो. फोटो प्रसिद्ध होतात. आत्मियतेने आयोजन अपेक्षित आहे ते केले जात नाही. वास्तविक अशा कार्यक्रमात, वेगवेगळ्या खात्याचे अधिकारी, गॅस एजन्सी, वजनमापांबाबत अधिकारी उपस्थिती हवी.ग्राहकांना ग्राहक संरक्षण कायदा समजवून सांगायला हवा ते होत नाही. कार्यक्रमात ग्राहकांची उपस्थिती वाढणे साठी प्रयत्न होत नाही.सालाबाद प्रमाणे कार्यक्रम साजरा करुन, वर्तमानपत्रात वृत्त प्रसिद्ध होते.यापलीकडे काही साध्य होत नाही.ते आपण दरवर्षी पहातोच. कार्यक्रम त्यांच्या पद्धतीने साजरे होतात. वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळते, त्यावर प्रतिक्रिया येतात, जैसे थे सुधारणा मात्र नाही. शासनाने या बाबतीत योग्य ती दखल घेणे आवश्यक आहे. व त्यात सुधारणा घडवून आणायला हवी हे मात्र नक्कीच.

शेवटी एकच म्हणावे लागेल.कायद्याने ग्राहकांना हक्क, अधिकार दिले आहेत.ग्राहक म्हणून त्याचा कसा वापर करायचा ते आपणच ठरवायचे आहे.

कारण...ग्राहक शक्ति + न्याय शक्ति + दंड शक्ती = शोषण मुक्ती हेच समीकरण आहे.न्याय मिळवण्यासाठी न घाबरता तक्रार करायलाच हवी.

ग्राहकाने त्यास दिलेल्या हक्काचा योग्य वापर करुन, आपली कर्तव्ये लक्षात ठेवून बाजारपेठेत जागृत राहून खरेदी करणेही अपेक्षित आहे,जेणे करुन तो फसवणुकीतून वाचू शकेल.

थोडक्यात राष्ट्रीय ग्राहक दिन,जागतिक ग्राहक दिन केवळ औपचारिकरित्या साजरे करून चालणार नाही, तर व्यापक प्रमाणावर ग्राहकचळवळ उभी राहाणे आवश्यक आहे.

**- दिलीप देशपांडे.**


**मोबा.८९९९५६६९१७**

# खेळाडूंसाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर 'क्रीडा ई-प्रमाण' प्रणाली सुरू

## बोगस क्रीडा प्रमाणपत्राला बसणार चाप; खेळाडूंना मिळणार आता घरबसल्या क्रीडा ई-प्रमाणपत्र

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, पुणे :** राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळण्याकरिता क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने 'क्रीडा ई-प्रमाण' ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारीत अद्ययावत प्रणाली कार्यान्वित केली आहे.




महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर सर्व शासकीय पदभरतीसाठी अर्ज करताना खेळाडूंना आता 'क्रीडा ई-प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राशिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा विचार केला जाणार नाही, तसेच ज्या खेळांचे अभिलेख प्रणालीवर उपलब्ध आहे, त्यांनी तात्काळ या प्रणालीचा लाभ घेऊन आपले डिजिटल पडताळणी प्रमाणपत्र घरबसल्या प्राप्त होणार आहे.

ज्यामुळे बोगस प्रमाणपत्रांना पूर्णपणे आळा - क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले ब्लॉकचेन तंत्रज्ञान ही प्रणाली ब्लॉकचेन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असल्याने यामध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप किंवा फेरफार करता येत नाही. त्यामुळे बोगस प्रमाणपत्रांना पूर्णपणे आळा बसणार आहे. असे सांगून क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यांनी सांगितले की, खेळाडूने माहिती भरल्यानंतर आणि मूळ माहितीशी ती जुळल्यास, अवघ्या २४ तासांच्या आत डिजिटल पडताळणी अहवाल उपलब्ध होणार आहे. प्रत्येक प्रमाणपत्रावर एक अद्वितीय क्युआर कोड असल्यामुळे संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांना प्रमाणपत्राची सत्यता त्वरित पडताळणी करता येणार आहे.

ज्या खेळाडूंनी यापूर्वी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्रमाणपत्रांची पडताळणी केलेली आहे, त्यांनी यापुढे शासकीय व निमशासकीय भरतीसाठी अर्ज सादर करावयाचा असल्यास, या प्रणालीद्वारे प्रमाणपत्र तयार करुन घेणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शक सूचनांसाठी खेळाडूंनी https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहल क्रीडा उपसंचालक सुधीर मोरे यांनी केले आहे.

# टाकळी ढोकेश्वर येथील पोलीस ठाण्याला अंतिम मंजुरी

## आमदार दाते यांच्या पाठपुराव्याला मोठे यश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३,पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत टाकळी ढोकेश्वर येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याला मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील अनेक गावांना नजीकच पोलीस प्रशासनाची सुविधा उपलब्ध होणार असून नागरिकांना तातडीने सेवा मिळणार आहे.

पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी तालुक्यात वाढत्या लोकसंख्येचा आणि भौगोलिक विस्ताराचा विचार करून नवीन पोलीस ठाण्यांची गरज सातत्याने शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर गतवर्षी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात त्यांनी हा मुद्दा मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच शासनाने अखेर हा निर्णय घेत राजपत्राद्वारे अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.

या नव्या पोलीस ठाण्यांच्या कार्यान्वयनामुळे तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर, सावरगाव, ढोकी, नांदुर पठार, कर्जुले हर्या, काटाळवेढा, वनकुटे, पळसपुर, मांडवे खुर्द, कासारे, खडकवाडी, म्हसोबाझाप, देसवडे, वारणवाडी, वासुंदे, गारगुंडी, वडगाव सावताळ, ढवळपुरी, पळशी, काकणेवाडी, पोखरी, हिवरे कोरडा, पिंपळगाव रोठा, माळकुप, अक्कलवाडी, काळकुप, तिखोल, भनगडेवाडी, कारेगाव, डोंगरवाडी, धोत्रे खुर्द, भोंद्रे, धोत्रे बु, तास, गाजदीपूर अशा एकुण पस्तीस गावांचा समावेश टाकळी ढोकेश्वर या स्वतंत्र कार्यक्षेत्रात होणार असून गुन्हे प्रतिबंध, कायदा-सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे अधिक सुलभ होणार आहे.

या निर्णयामुळे पारनेर पोलीस ठाण्यावरील पूर्वीचा भार कमी होणार असल्याने सबंधित पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील पारनेर शहर, विरोली, पुणेवाडी, हातलखिंडी, सिध्देश्वरवाडी, बहिरोबावाडी, पानोली, कान्हुरपठार, वडुले, पिंपळगाव तुर्क, राळेगणसिध्दी, पिंपळनेर, वडगाव दर्या, भांडगाव, वेसदरे, वडगाव आमली, पिंप्री पठार, दैठणे गंजाळ, शेरी कोलदरा, सारोळा आडवाई, निघोज, किन्ही, जामगाव, गांजीभोयरे, लोणी हवेली, पिंप्रीजलसेन, शिरापुर, सांगवीसूर्या, चोंभुत, जवळा, रेनवडी, गुणोरे, पाडळी आळे, गाडीलगाव, कळस, राळेगण थेरपाळ, आळकुटी, हाकीगतपुर, माजमपुर, म्हस्के वाडी, कोहकडी, शेरीकासारे, मोरवाडी, पाबळ, म्हसे खुर्द, गारखिंडी, दवाणवाडी, वडझिरे, पठारवाडी, लोणी मावळा, चिंचोली, देवीभोवरे, दरोडी, वडगाव गुंड, पाडळी दर्या, शिरसुले, बाभुळवाडे, वडनेर बु, जाधववाडी, भाळवणी, रांधे, गोरेगाव, डिस्कळ, पाडळी तर्फे कान्हुर, कुरुंद, करंदी या सहसष्ट गावांतील नागरिकांनाही सुरळीत सुविधा मिळणार आहे.

संपूर्ण पारनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील संपूर्ण एकशे एक गावांतील नागरिकांना या नवीन मंजुरीमुळे सुरळीत सुविधा मिळणार असल्याने व या अगोदरच सुपा पोलिस ठाण्याचा स्वतंत्र कारभार सुरु असल्याने संपूर्ण तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मध्यमवर्गीय गृहकर्जदारांना २.५० लाखांची सबसिडी द्या

## खा.धानोरकर यांची केंद्रीय आवास आणि शहरी कार्य केंद्रीय मंत्री मनोहर लाल यांना पत्र

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मध्यमवर्गीय गृह कर्ज घेणाऱ्या लाभार्थ्यांना मिळणारी २.५० लाखांची प्रलंबित 'क्रेडिट लिंक्ड सबसिडी' तात्काळ वितरीत करण्यात यावी, अशी आग्रही मागणी खा. प्रतिभा धानोरकर यांनी केंद्र सरकारकडे केली.



यासंदर्भात त्यांनी केंद्रीय आवासन व शहरी कार्य केंद्रीय मंत्री मनोहर लाल यांना सविस्तर पत्र पाठवून, चंद्रपूर जिल्ह्यातील शेकडो कुटुंबांना भेडसावणाऱ्या या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांनी पत्रात नमूद केले की, सन २०१७ ते २०२१ या कालावधीत बँकांकडून गृह कर्ज घेणाऱ्या अनेक पात्र लाभार्थ्यांना अद्याप योजनेनुसार अपेक्षित असलेली सबसिडी प्राप्त झालेली नाही. 'ग्राहक पंचायत महाराष्ट्र' या संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, अनेक वर्षे उलटूनही ही रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा न झाल्याने सर्वसामान्य कर्जदारांवर २.५९ लाखांच्या अतिरिक्त मुद्दलाचा आणि त्यावर वाढत असलेल्या व्याजाचा मोठा आर्थिक भार पडत आहे. यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांचे आर्थिक बजेट कोलमडले असून नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन, ज्या पात्र लाभार्थ्यांचे अर्ज तांत्रिक कारणास्तव किंवा निधीअभावी प्रलंबित आहेत. त्यांना सबसिडीची रक्कम तात्काळ वितरित करण्यासाठी संबंधित विभागाला आदेश द्यावेत. तसेच केंद्र सरकारने यावर तातडीने कार्यवाही करुन सामान्य कुटुंबांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी खा.प्रतिभा धानोरकर यांनी केली आहे.

# उष्माघाताबाबत नागरिकांनी काळजी घ्यावी - जिल्हाधिकारी गौडा

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणची बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** मागील आठवड्यापासून उन्हाची तिव्रता अचानक वाढली असून उष्णतेच्या बाबतीत चंद्रपूर जिल्हा नेहमीच अग्रस्थानावर असतो. यावर्षी सुद्धा तापमान वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्माघाताबाबत काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी अशोक कटारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलीम शेख आदी उपस्थित होते.




जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, दिवसा व रात्रीच्या उकाड्यात वाढ झाली असून सामान्यापेक्षा तापमान जास्त राहण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. दुपारी १२ ते ४ या वेळात कोणतेही शासकीय कार्यक्रम घेऊ नये.

लहान मुले, वयोवृध्द नागरिक आणि व्याधीग्रस्त नागरिकांची विशेष काळजी घ्यावी. प्रत्येक स्तरावर उष्माघात याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करावी. शाळा, आंगणवाडी आदींच्या वेळेत बदल करण्याचे शिक्षण विभागाने निर्देश द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

**✻ उष्मालाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने घ्यावयाची दक्षता ✻**

पुरेसे पाणी प्यावे, तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी घ्या, घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा, दुपारी १२ ते ४ वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळा, सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करा, हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरा, प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवा, उन्हात काम करीत असल्यास टोपी, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकण्यात यावा, शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी, ताक इत्यादींचा वापर नियमित करावा. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावित व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.

**✻ काय करु नये ✻**

उन्हात अतिकष्टाची कामे करु नका, दारु, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेय घेऊ नका. दुपारी १२ ते ४ च्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळा, उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका, लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये, गडद घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे, बाहेर तापमान जास्त असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावी.

**✻ उष्माघाता संदर्भात आजाराची लक्षणे ✻**

चक्कर येऊन पडणे, फेफरे येणे/झटके येणे, झोपेतून उठण्यास त्रास येणे/ उठता न येणे, गोंधळल्यासारखे बोलणे/ वागणे, श्वासाची व हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे, शरिराचे तापमान १०५ अंशापेक्षा अधिक होणे, स्नायूत पेटकेनयेणे, चिडचिड होणे, डोकेदुखी, अशक्तपणा येणे, मळमळ व उलटी होणे, अधिक घाम येणे इत्यादी.

# शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांना श्रध्दांजली अर्पण

## घरासमोरुन पुष्पवृष्टी करून अंत्ययात्रेत सहभागी व्हावे




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१३, पाटण (सातारा) :** पिंपळोशी येथील वीर जवान बाळकृष्ण निकम हे भारत मातेच्या रक्षणासाठी सेवेत असताना सिक्कीम येथे शहीद झाले. त्यांचे पार्थिव उद्या शनिवार, दिनांक १४ मार्च २०२६ रोजी सकाळी ७ वा. पाटण केरा पुल येथे येणार आहे. येथून फुलांनी सजविलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली मधून अंत्ययात्रेला सुरुवात होणार आहे. ही अंत्ययात्रा पाटण शहर झेंडा चौक, लायब्ररी चौक मार्गे बी.डी कॉलेज, मेष्टेवाडी, कवडेवाडी, पिंपळोशी अशी होणार आहे. देशासाठी बलिदान दिलेल्या या वीर जवान यामुळे आपण भारतवासी सुरक्षित आहोत. शहीद बाळकृष्ण निकम यांचे बलिदान आपल्या प्रत्येकांसाठी प्रेरणादायी आहे. भारत मातेच्या या वीर जवानासाठी त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी प्रत्येक पाटण वासीय नागरिकांनी या अंत्ययात्रेत सहभागी होऊन त्यांच्या पार्थिवावर पुष्पवृष्टी करून श्रद्धांजली अर्पण करावी. हे आपण भारतीय असल्याचे कर्तव्य आहे.

या अंत्ययात्रे वेळी मार्गाच्या दुतर्फा रहिवासी असलेल्या सर्व नागरिकांनी अंत्ययात्रा घरासमोर येताच पुष्पवृष्टी करुन श्रद्धांजली अर्पण करावी. मार्गावरील सर्व गणेश मंडळ, दुर्गा उत्सव मंडळ यांनी शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांना श्रध्दांजली चे फ्लेक्स बोर्ड लावावेत. या अंत्ययात्रेत श्रीमंत दादासाहेब पाटणकर हायस्कूल म्हावशी, कै. ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल पाटण, माने-देशमुख विद्यालय पाटण, कै.सौ. सुलोचनाबाई पाटणकर कन्याशाळा पाटण, बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण चे विद्यार्थी - विद्यार्थीनीं मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. शहीद वीर जवान बाळकृष्ण निकम यांची अंत्ययात्रा पिंपळोशी येथे पोहचल्यानंतर तिथे शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

# मुंब्रा विभागत गुढीपाडवा स्वागत यात्रेचे मोठ्या प्रमाणात अयोजन - माजी आमदार भोईर

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, मुंब्रा (ठाणे) :** सालाबाद प्रमाणे यंदाही गुरुवार, दि.१९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता मुंब्रा स्टेशन समोरील श्री.शनी मारुती मंदिर ते मुंब्रेश्वर शंकर मंदिरा पर्यंत मराठी नविन वर्षो निमीत्त भव्य, दिव्य अशी शोभा यात्रा श्री.मुंब्रेश्वर महादेव नववर्ष स्वागत समिती मुंब्रा कौसा, शिळ, दिवा, कल्याणफाटा अशा माजी. आमदार श्री. सुभाष भोईर साहेब यांच्या मार्गदर्शना खाली मोठ्या प्रमाणात काढण्यात येणार आहे. ही भव्य, दिव्य गुढीपाडवा शोभा यात्रा



सायंकाळी ४ वाजता मुंब्रा स्टेशन समोरील मंदिरा पासुन वाजत गाजत मुंब्रा शंकर मंदिरा पर्यंत मोठ्या उत्साहात धार्मिक स्वरुपात काढण्यात येणार भगीरथ मध्ये राम. सीता, बजरंग बली, मिरवणुकीत विराजमान करून पुणेरी ढोल बॅन्जोपार्टी, आराध्याचा मेळा, पारंपारीक वेशभुषा, बैलगाडी, चलचित्र, गोंधळी, दांडपट्टा अशा अनेक धार्मिक कार्यक्रमा सह तसेच अनेक देवादेवतांची वेशभुषा हया गुढीपाडवा स्वागत यात्रेमध्ये सामील होणार आहेत.

उपरोक्त भागातील प्रतिष्ठित नागरीकांनी महिला बचत गट, सेवा भावी संस्था सार्वजनिक मंडळ, गणपती उत्सव मंडळ, नवरात्री उत्सव मंडळ तसेच सर्व जाती धर्माच्या पंथाच्या नागरीकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन गुढीपाडवा स्वागत यात्रेची शोभा वाढवावी. तसेच गुढीपाडवा स्वागत यात्रा दरम्यान कोणत्याही धर्माच्या भावना दुखावतील अशा घोषणा-नारे देऊ नये असे जाहीर आव्हाण मा.नगरसेवक सुधिर भगत तसेच हया कार्यक्रमाचे आयोजक संचालक सुमित भोईर हयानी सर्व नागरीकांना व प्रतिष्ठित नागरिकांना आमंत्रित केले आहे. तसेच स्वागत यात्रा कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी कार्यक्रमाचे व्यवस्थापक अतुल सुर्वे, मो.नं ९९८७७०००९० तसेच प्रविण महाकाल ७९७७५८४६२२ हया नंबरवर संपर्क करावा.

कार्यालय :- मा. आमदार सुभाष भोईर जनसंपर्क कार्यालय, मेक कंपनी बाबाजी पाटील वाडी समोर मुंब्रा ४००६१२

# पती व सासू कडून विवाहितेस जबर मारहाण; पोलिसांची दोन्ही आरोपीवर कारवाई

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१३, चिमूर (चंद्रपूर) :** तालुक्यातील शंकरपूर येथील घटस्फोटीत महिलेला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्याशी गंधर्व विवाह केला. परंतु तिला घरी नेण्यास नकार दिल्यावर ती महिला बळजबरीने पतीच्या घरी गेली असता तिला बेदम मारहाण केल्याने पती व सासूहिला पोलिसांनी अटक करून न्यायालयात हजर केले. शंकरपूर येथील पौर्णिमा बबन बगाडे या घटस्फोटीत महिलेशी शंकरपूर येथीलच नरेंद्र महादेव कोलते याचे प्रेम संबंध जुळले. त्यानंतर त्यांनी सन २०१५ मध्ये गंधर्व विवाह केला. व काही दिवसातच तुला आपल्या घरी नेतो असे नेहमी सांगत होता. आणि तिच्या घरी मुक्कामाने जाऊन शारीरिक संबंध ठेवत होता. त्या संबंधातुनच सन २०१६ मध्ये त्यांना मुलगा झाला. परंतु काही दिवसांनी हा मुलगा माझा नाही असा पवित्रा नरेंद्र यांनी घेतला. त्यामुळे तिने त्याच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागितली असता, मुलाचे न्यायालयाच्या आदेशाने डीएनए टेस्ट करण्यात येऊन हा मुलगा त्याचाच असल्याचे सिद्ध झाले. त्यानंतर त्यांनी मुलगा माझाच असल्याचे कबूल सुद्धा केले. व त्यानंतरही तिच्या वारंवार घरी जाऊन तिच्याशी संबंध कायम ठेवले. परंतु तुला व मुलाला आपल्या घरी नेतो असे सांगून नरेंद्र हा दहा वर्षापासून सतत हुलकावणी देत असल्याने तिने दिनांक ०७ मार्च रोजी सायंकाळी ८ वाजता मुलाला घेऊन पतीचे घर गाठले असता तिचे सासरे तिला घरी ठेवायला तयार झाले. परंतु पती व तिची सासू यांनी तिला घरात ठेवण्यास नकार देऊन जबर मारहाण केली व घरातून हाकलून लावले. त्यानंतर पौर्णिमा हिने पोलीस चौकी गाठून पती व सासूची तक्रार दिली.

पोलिसांनी तिला प्राथमिक आरोग्य केंद्र शंकरपूर मध्ये उपचारासाठी दाखल केले असता जबर मार असल्याने तिला जिल्हा रुग्णालया मध्ये रेफर केले. पोलिसांनी पती नरेंद्र महादेव कोलते व सासू सोनाबाई महादेव कोलते यांची चौकशी करून व दोघांवर विविध कलम ११८ (२), ३ (५), ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल करून चारसिट न्यायालयात दिनांक आठ मार्चला दाखल केली आहे. पीडित महिला पौर्णिमा हिने आपल्याला न्याय मिळावा अशी मागणी केली आहे.

## थोडक्यात बातम्या

# उपमहापौर देवकर यांच्या धडक कारवाईने योगी राजेंद्र नगरमधील वृक्षतोड थांबली



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१३, सोलापूर :** शहरातील योगी राजेंद्र नगर परिसरातील मशाळ वस्ती येथे मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणात सुरू असलेली वृक्षतोड सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांच्या धडक हस्तक्षेपामुळे तात्काळ थांबवण्यात आली. परिसरातील नागरिकांकडून मोठ्या झाडांची बेकायदेशीर तोड सुरू असल्याची माहिती मिळताच उपमहापौर देवकर यांनी त्वरित घटनास्थळी धाव घेतली. तेथे मशीनच्या सहाय्याने झाडे तोडण्याचे काम सुरू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यावेळी त्यांनी संबंधितांना कडक शब्दांत जाब विचारत वृक्षतोड तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले. घटनास्थळी उपस्थित अधिकाऱ्यांना संबंधित मशीन जप्त करण्याबाबत तसेच वृक्षतोडीत सहभागी असलेल्या संबंधित व्यक्ती, ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. पर्यावरणाला हानी पोहोचवणारी बेकायदेशीर वृक्षतोड कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून शहरातील झाडांचे संरक्षण करण्यासाठी महापालिकेने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, उपमहापौर देवकर यांच्या तात्काळ कारवाईमुळे सुरू असलेली वृक्षतोड थांबल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# रिपब्लिकन ऐक्यासंदर्भात सकारात्मक - डॉ.गवई; राहुरी पोटनिवडणुकीच्या जागेवर रिपाईचा दावा



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१३, राहुरी (अहिल्यानगर) :** रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यासंदर्भात प्रमुख नेत्यांशी चर्चा सुरू असून या विषयावर आपण सकारात्मक असल्याचे मत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.राजेंद्र गवई यांनी व्यक्त केले. महाविकास आघाडीने आघाडीचा धर्म पाळत राहुरी पोटनिवडणुकीची जागा रिपाईला सोडावी, अन्यथा वेगळा विचार करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.राहुरी येथे स्वातंत्र्यसैनिक गोपीनाथ वाघमारे बहुउद्देशीय संस्था (खळी) यांच्या वतीने आयोजित पत्रकार सन्मान सोहळ्यानिमित्त झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष सुधाकरराव रोहम, पत्रकार किशोर वाघमारे, सरचिटणीस दादासाहेब यादव, साहेबराव यादव, अलकाताई बोर्डे, उत्तमराव साळवे, बाळासाहेब मोकळ, वामनराव नवतुरे, हर्षद साळवे, सुजित साळवे, सारिका गांगुर्डे, सोनाली गुंजाळ, बाळासाहेब भांड, योगेंद्र गायकवाड आदींसह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात तालुक्यातील पत्रकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला. राहुरी, पाथर्डी, नगर मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली असून लवकरच पोटनिवडणुकीची तारीख जाहीर होण्याची शक्यता आहे. पडत्या काळात आम्ही महाविकास आघाडीला साथ दिली असून पुढेही देत आलो आहोत. मात्र आमचा केवळ वापर करून घेण्यात येऊ नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.गत काही महिन्यांपासून मतदारसंघात पक्षबांधणी सुरू असून निवडणुकीसाठी पक्षात अनेक इच्छुक आहेत. त्यामुळे आम्हाला हलक्यात घेऊ नये. आम्ही आघाडीसोबत प्रामाणिकपणे राहिलो असून आता आम्हाला उमेदवारी द्यावी. अन्यथा उमेदवार पाडण्याची ताकद आमच्यात असल्याचा थेट इशारा डॉ.गवई यांनी दिला. रिपब्लिकन ऐक्य संदर्भात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासोबत नुकतीच बैठक झाली असून विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. सर्व गटांकडून ऐक्य व्हावे, अशी भावना व्यक्त होत आहे. ऐक्य झाल्यास संघटनेतील तिसरे क्रमांकाचे पद आम्हाला द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनीही सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

# अलिबागमध्ये कोल्हापूरचे स्पेशल नाडी तज्ञ डॉ.चंदनशिव यांचे आरोग्य मार्गदर्शन



**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.१३, अलिबाग (रायगड) :** अलिबाग उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे कोल्हापूरचे प्रसिद्ध स्पेशल नाडी तज्ञ डॉ.समीर चंदनशिव यांच्या उपस्थितीत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरामध्ये संधिवात, गुडघेदुखी, मणक्याचे आजार, मधुमेह तसेच इतर विविध आजारांवर नाडी परीक्षण पद्धतीने तपासणी करण्यात आली. शिबिरामध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला असून रुग्णांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. डॉ.समीर चंदनशिव यांनी रुग्णांना आयुर्वेदिक उपचार पद्धतीबाबत मार्गदर्शन केले. सर्व औषधे आयुर्वेदिक असून त्याचा रुग्णांना चांगला फायदा होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच डॉ.समीर चंदनशिव महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथा,वार- गुरुवार व शुक्रवार अलिबाग येथे रुग्ण तपासणीसाठी उपलब्ध राहणार आहेत.